
सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३४७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

थोडक्यात

आंध्र प्रदेशात खासगी ट्रॅव्हलची डंपरला जोरदार धडक; 13 जणांचा मृत्यू



मुंबई| आंध्र प्रदेशातील मार्कापुरम जिल्ह्यात आज पहाटेच्या सुमारास एक हृदयद्रावक घटना घडली आहे. रायवरमजवळ एका खासगी ट्रॅव्हल्सची डंपरशी भीषण धडक होऊन झालेल्या अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या भीषण अपघातात बस पूर्णपणे जळून खाक झाली असून, मृतांचा आकडा अधिकृतपणे १३ असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने स्पष्ट केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 'हरिकृष्णा ट्रॅव्हल्स'ची ही बस तेलंगणातील निर्मल येथून आंध्र प्रदेशातील नेल्लोरकडे जात होती. आज (२६ मार्च) पहाटे सहाच्या सुमारास मार्कापुरम जिल्ह्यातील रायवरमजवळ बस आणि एका डंपरची समोरासमोर जोरदार धडक झाली.

आयपीएलचा उद्घाटन सोहळा रद्द

मुंबई : आयपीएल २०२६ ची सुरुवात २८ मार्चपासून होणार असली तरी यंदा स्पर्धा कोणत्याही उद्घाटन सोहळ्याशिवाय सुरू होणार आहे. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (RCB) आणि सनरायझर्स हैदराबाद (SRH) यांच्यात पहिला सामना खेळला जाणार आहे. मात्र, बीसीसीआयने यंदा ओपनिंग सेरिमनी रद्द करण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ४ जून २०२५ रोजी बंगळुरूमध्ये घडलेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्दैवी घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी बीसीसीआयने आयपीएलच्या १९व्या हंगामाचा उद्घाटन सोहळा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी स्पष्ट केले की, या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर उद्घाटन दिवशी कोणताही सांस्कृतिक किंवा मनोरंजन कार्यक्रम आयोजित केला जाणार नाही.

इराणसोबत आर-पारच्या लढाईसाठी अमेरिकेची तयारी, आखातात उतरले US लष्कर



नवी दिल्ली | मध्य पूर्वेत दारूगोळ्याचा वास अधिकच गडद झाला आहे. अमेरिकेच्या 'ऑपरेशन एपिक फ्युरी'ला चार आठवडे उलटले असून, इराक युद्धानंतर कधीही न पाहिलेल्या युद्धाच्या उंबरठ्यावर आखाती प्रदेश उभा आहे. एकीकडे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प तेहरानसोबत चर्चा करत असल्याचा दावा करत आहेत, तर दुसरीकडे हजारो अमेरिकी सैनिकांचा ताफा इराणला वेढा घालण्यासाठी पुढे सरकत आहे.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांड (CENTCOM) नुसार, आतापर्यंत बॅलिस्टिक क्षेपणास्त्र युनिट्सपासून ते रिव्होल्यूशनरी गार्ड्सच्या (IRGC) मुख्यालयांपर्यंत 9,000 हून अधिक इराणी लक्ष्यांना लक्ष्य करण्यात आले आहे. होर्मुझची सामुद्रधुनी तणावाचे केंद्र बनली आहे. जगातील २० टक्के तेल व्यापार रोखण्याच्या इराणच्या प्रयत्नांना प्रत्युत्तर म्हणून, अमेरिकेने आपले सर्वात घातक भूदल आणि नौदल तैनात केले आहे. पेंटागॉनच्या या निर्णयामुळे हे स्पष्ट झाले आहे की, अमेरिका केवळ हवाई हल्ल्यांपुरती मर्यादित राहणार नाही, परंतु गरज पडल्यास जमिनीवरील कारवाई करण्यासही मागे हटणार नाही.

7,000 अतिरिक्त सैनिकांची तुकडी

युएसएस अब्राहम लिंकन स्ट्राइक ग्रुप सध्या युद्धक्षेत्रात कार्यरत आहे. युएसएस जेराल्ड आर. फोर्ड सध्या दुरुस्तीसाठी भूमध्य समुद्रात असली तरी, नवीन सैनिकांच्या आगमनामुळे अमेरिकेच्या लष्करी क्षमतेत लक्षणीय वाढ होईल. मरीन आणि हवाई दलाच्या सैनिकांसह सुमारे 7,000 नवीन जवान आघाडीवर सामील होत आहेत. सागरी मरीन कमांडो आणि हवाई पॅराट्रूपर्स यांचे हे संयोजन इराणविरुद्ध 'पिंसर मूवमेंट' चहुकडून हल्ला' दर्शवते.

राशन कार्ड धारकांना मिळणार 3 लिटर केरोसीन, महायुती सरकारचा निर्णय



मुंबई | आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. संभाव्य LPG टंचाईच्या पार्श्वभूमीवर शिधापत्रिकाधारकांना दरमहा 3 लिटर केरोसीन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे स्वयंपाकासाठी गॅसवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण भाग आणि कमी उत्पन्न गटातील नागरिकांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

याशिवाय, ज्यांच्याकडे शिधापत्रिका नाही अशा कुटुंबांनाही केरोसीन उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. यासाठी स्थानिक प्रशासन आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे विशेष यंत्रणा उभी केली जाणार आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, युद्धामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे LPG सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी पर्यायी उपाय म्हणून केरोसीन वाटपाचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, नागरिकांनी घाबरून साठेबाजी करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. पुरेसा साठा उपलब्ध असून नियोजनबद्ध पद्धतीने वितरण केले जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

मध्य आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान उद्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार

नवी दिल्ली | मध्य आशियातील वाढत्या तणावाच्या आणि युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या शुक्रवारी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार आहेत. इराणने 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ' या महत्त्वाच्या सागरी मार्गावर नियंत्रण मिळवल्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या गंभीर जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी केंद्र आणि राज्यांनी 'टीम इंडिया'च्या भावनेने एकत्र काम करावे, या उद्देशाने ही बैठक बोलावण्यात आली आहे. मंगळवारी राज्यसभेत बोलताना पंतप्रधानांनी या युद्धाचे परिणाम दीर्घकाळ टिकू शकतात, असा इशारा देत सर्वांना सज्ज राहण्याचे आवाहन केले होते.

पंतप्रधानांनी कोरोना महामारीच्या काळातील केंद्र आणि राज्यांच्या यशस्वी सहकार्याची आठवण करून दिली. त्याच धर्तीवर आताही चाचण्या, लसीकरण आणि जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याप्रमाणेच या संकटातही समन्वय राखणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मध्य आशियातील युद्ध आणि भारताची सज्जता

- पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी सायंकाळी साडेसहा वाजता मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार आहेत.
- 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ' मधील तणावामुळे इंधन पुरवठ्यावर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेतला जाईल.
- कोरोना काळाप्रमाणेच 'टीम इंडिया' भावनेने केंद्र-राज्य सहकार्यावर भर दिला जाणार आहे.
- देशात इंधनाचा पुरेसा साठा असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

आयपीएल 2026 च्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने अधिक कडक केले नियम, कॅचच्या नियमांबाबत कॅप्टनला केले अलर्ट



नवी दिल्ली | आयपीएल २८ मार्च 2026 पासून सुरू होणार आहे. स्पर्धेपूर्वी, बीसीसीआयने सर्व संघांच्या कर्णधारांची भेट घेऊन नियमांसंदर्भात मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सामन्याच्या दिवशीच्या सरावावर बंदी घालण्यापासून ते कौटुंबिक प्रवासावर मनाई करण्यापर्यंत, बीसीसीआयने सर्व कर्णधारांना स्पष्टपणे कळवले आहे की, कॅच तेव्हाच वैध मानला जाईल, जेव्हा क्षेत्ररक्षकाचे चेंडू आणि त्याच्या शरीरावर पूर्ण नियंत्रण असेल आणि त्यानंतरच त्याने आनंद साजरा करावा.

बीसीसीआयने कॅचच्या नियमावरून कर्णधारांना इशारा दिला आहे.

खरं तर, अनेकदा असं दिसून येतं की खेळाडू पूर्णपणे तोल सांभाळू शकत नसतानाही कॅच चा आनंद साजरा करतात. यामुळे अनेकदा वाद निर्माण होतात. आयपीएल 2026 आयपीएल साठी बीसीसीआयने यावर बंदी घातली आहे.

बीसीसीआयच्या मते, कॅच घेताना चेंडू हातात आल्यानंतर क्षेत्ररक्षकाने त्यावर पूर्ण नियंत्रण दाखवले पाहिजे. क्षेत्ररक्षकाचे शरीर आणि संतुलन पूर्णपणे स्थिर असले पाहिजे. कॅच घेताना शरीराचा तोल न सांभाळता किंवा जमिनीशी संपर्क झाल्यास, तो कॅच रद्द होऊ शकतो. याचा अर्थ, आधी कॅच पूर्ण करावा आणि मग आनंद साजरा करावा.

खेळाच्या अटींच्या कलम ३३.३ नुसार, जेव्हा चेंडू प्रथम क्षेत्ररक्षकाच्या शरीराला स्पर्श करतो तेव्हा कॅच सुरू झाला असे मानले जाते आणि जेव्हा क्षेत्ररक्षकाचे चेंडूवर आणि स्वतःच्या हालचालीवर पूर्ण नियंत्रण येते तेव्हा कॅच संपला असे मानले जाते.

जरी हा नियम नवीन नसला तरी, बीसीसीआयने 25 मार्च रोजी कर्णधारांसोबत झालेल्या बैठकीत त्याचे महत्त्व अधोरेखित केले.



CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

बिडवे अभियांत्रिकीच्या कार्यशाळेस प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : येथील एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात इंडो जर्मन टूल रूम,छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता जागरूकता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली.

सुरज चंचलानी,डायरेक्टर सीबीएफसी लिमिटेड यांनी विद्यार्थ्यांना या विषयावर मार्गदर्शन केले तसेच शासनामार्फत चालवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली ज्यामुळे हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरले. तसेच विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी शोधण्यासाठी मोलाचे ज्ञान आणि प्रेरणा मिळाली.

या कार्यशाळेत अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा.श्रीकांत नागुरे,डॉ. ओमप्रकाश शिवपुजे,श्री संतोष सांगवे तसेच समन्वयक प्रा.राहुल व्यवहारे, प्रा. सुरज बिराजदार यांनी सर्व प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली.

विविध वृत्त...

फरार आरोपीस अटक

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : लातूर जिल्हा पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेकडून फरार आरोपींच्या शोधासाठी सातत्याने विशेष मोहिम राबविण्यात येत असून, त्या अनुषंगाने एक महत्त्व-पूर्ण यश मिळाले आहे. मागील तब्बल १३ वर्षांपासून फरार असलेला आणि विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये पाहिजे असलेला आरोपी पुणे येथून जेरबंद करण्यात आला आहे.

किल्लारी व गांधी चौक पोलीस ठाणे लातूर येथील गंभीर गुन्ह्यांतील पाहिजे आरोपी दयानंद पांडुरंग देडे (वय ३६ वर्षे, रा. नांदुर्गा ता. औसा जि. लातूर) हा मागील १३ वर्षांपासून फरार होता. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक फौजदार सर्जेराव जगताप यांनी शोध घेण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली. या पथकामध्ये साहेबराव हाके, अर्जुन राजपूत, राजेश कंचे, मनोज खोसे, शैलेश सुडे यांचा समावेश होता. मिळालेल्या माहितीनुसार पथकाने तत्काळ हालचाल करत पुणे येथे जाऊन गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीचा शोध घेतला. सखोल तपास व नियोजनपूर्वक केलेल्या कारवाईदरम्यान आरोपी हा नागेश्वर कॉलनी, मोशी, ता. हवेली, जि. पुणे येथे आढळून आला. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत त्यास ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस ठाणे किल्लारी

बाजारात टरबुजाची आवक वाढली

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : येथील बाजारात टरबूज, खरबुजाची आवक वाढली असून, त्यांचे दर घसरले आहेत. उन्हाची तीव्रता वाढली असली तरी चांगल्या दर्जाच्या टरबुजाचे वाढले नाहीत. दर्जेदार किलो-दीड किलोचे टरबूज शंभर रुपयाला तीन नग दिले जात आहे.

दर सर्वसामान्य ग्राहकांच्या आवाक्यात आल्याने खरेदी वाढली आहे. शहरातील विविध रस्त्यावर टरबुजाची दुकाने थाटण्यात आली आहेत.

'चन्नबसवेश्वर 'च्या मुलींना दिले प्रशिक्षण

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : येथील चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने महापालिकेच्या पीएमश्री सावित्रीबाई फुले शाळा क्र. ९ येथे हरघर दुर्गा हे स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यात आले.

मुलींमध्ये वैयक्तिक सुरक्षिततेबाबत जागरुकता निर्माण करणे, त्यांना मूलभूत स्वसंरक्षण कौशल्य देणे हे या प्रशिक्षणाचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. मुलींना धनश्री मदने हिने प्रशिक्षण दिले. यावेळी मुख्याध्यापक एस. पी. शिंदे, महेश माणके, डॉ. ऐश्वर्या इरलापल्ले यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे संस्थेचे सचिव भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त विजयकुमार मठपती, अरुण हलकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी आदींनी कौतुक केले आहे.

अचूक जनगणनेसाठी सजग राहून काम करा : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : ज्याप्रमाणे निवडणुकांचे आयोजन महत्त्वाचे असते, त्याचप्रमाणे जनगणना ही प्रक्रिया देखील देशासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मूल्यमापन करणाऱ्या या प्रक्रियेतूनच देशाच्या विकासाचा खरा रोडमॅप तयार होतो. त्यामुळे जनगणनेच्या कामात सर्वांनी सजग राहून, अचूक नियोजन करावे आणि कोणतीही दिरंगाई करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले.



भारताची जनगणना २०२७ अंतर्गत तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांच्या दुसऱ्या टप्प्यातील तीन दिवसीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. या सत्राच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या प्रशिक्षण सत्राला जनगणना संचालनालयाचे सहसंचालक रमेश भोसले, मिलिंद पाटील, लातूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा जनगणना समन्वयक विठ्ठल परब यांच्यासह जिल्ह्यातील २३ चार्ज अधिकारी आणि १०६ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ते देशाचे सामाजिक आणि आर्थिक प्रतिबिंब आहे. प्रत्येक घर आणि प्रत्येक कुटुंब जनगणनेत समाविष्ट होईल याची दक्षता घ्यावी. प्रगणकांनी अचूक काम करावे यासाठी त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रगणकांनी लोकांशी संवाद साधताना सकारात्मक राहावे, जेणेकरून जनतेचा प्रत्यक्ष सहभाग वाढेल. सर्व चार्ज अधिकारी आणि प्रशिक्षणार्थींनी आपापसात समन्वय ठेवून हे काम यशस्वी करावे. दहा वर्षांनंतर येणारी ही जनगणनेची प्रक्रिया देशसेवेची एक मोठी संधी आहे. प्रशिक्षणातील सूक्ष्म गोष्टी समजून घ्या आणि कोणतीही समस्या असल्यास त्याचे वेळीच निरसन करून घ्या. या कामात कसलाही हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या. यावेळी जनगणना संचालनालयाचे सहसंचालक रमेश भोसले यांनी उपस्थितांना तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणना कायदा, चार्ज अधिकारी यांची वैयक्तिक जबाबदारी, घरांची निवड, इमारतींना क्रमांक देण्याची पद्धत आणि जनगणनेतील विविध टप्प्यांची सविस्तर माहिती दिली.

जि.प. अधिकाऱ्यांच्या गाड्या पदाधिकाऱ्यांना

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : झेड. पी. अधिकाऱ्यांच्या गाड्या पदाधिकाऱ्यांना दिल्या जात असल्याने अधिकाऱ्यांची मोठी अडचण होत आहे. झेड. पी. पदाधिकाऱ्यांना त्यांच्या मनावर वाहने पुरवावी लागतात. त्यांना ज्या गाड्या पाहिजेत, त्या दिल्या गेल्या पाहिजेत, असा संकेत आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांकडील गाड्या पदाधिकाऱ्यांच्य दिमतीला दिल्या जात असल्याने अधिकाऱ्यांची पंचाईत होत आहे. झेड. पी.कडे चारचाकी गाड्या असल्या तरी गेल्या चार वर्षांत पदाधिकाऱ्यांसाठी असलेल्या गाड्या अधिकारी वापरत होते. आता पदाधिकारी आल्याने त्यांना उपलब्ध गाड्यांची माहिती देऊन ते मागतील ती वाहने पुरवण्याची जबाबदारी झेड. पी. प्रशासनाची असते. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही सुरू केली.

परिणामी, अधिकाऱ्यांना चार वर्षांत पदाधिकारी नसल्याने आवडीच्या गाड्या पदाधिकाऱ्यांच्या हिस्स्याला जात आहेत. झेड. पी.च्या मालकीच्या गाड्या कमी असल्या तरी भाडेतत्त्वावर गाड्या घेऊन त्या पुरविण्याची जबाबदारी झेड. पी.ला पार पाडावी लागते. आणखी सभापती यायचे आहेत. त्यांनाही चारचाकी गाड्या पुरविल्या पाहिजेत. अधिकाऱ्यांना वाहने आता भाड्याने घ्यावी लागणार आहेत, अशी परिस्थिती दिसत आहे.

लातुरात दोन दिवसीय ' मानसरंग' नाट्य महोत्सवाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : लातुरात दि. २८ व २९ मार्च २०२६ रोजी मानसिक आरोग्याच्या विविध पैलूंवर भाष्य करणाऱ्या ' मानसरंग ' नाट्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च सेंटरचे संचालक - लातूरचे ख्यातनाम मानसोपचार तज्ञ डॉ. मिलिंद पोतदार यांनी दिली. या नाट्यमहोत्सवात दोन दिवसांमध्ये एकूण चार नाटके सादर होणार आहेत.

शनिवार, दि. २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता संत तुकाराम महाराज यांचा सामान्य माणूस ते भक्त , भक्त ते देव व देवत्वापर्यंतचा प्रवास प्रेक्षकांसमोर मांडणारे ' आनंदओवरी' हे नाटक होणार आहे. यामध्ये डॉ. मिलिंद पोतदार यांची भूमिका पाहायला मिळणार आहे. प्रख्यात लेखक दि. बा. मोकाशी यांनी लिहिलेल्या कथानकाची नाट्य आवृत्ती अतुल पेठे यांनी केली आहे. या नाटकाचे दिग्दर्शन श्रुतिकांत ठाकूर यांनी केले आहे. दुपारी अडीच वाजता लेखक च.प्र. देशपांडे यांनी लिहिलेले व अभिजित झुंजारराव यांनी दिग्दर्शित केलेले 'मन' हे नाटक सादर होईल. यंत्रमेश वाणी यांनी भूमिका साकारली आहे. रविवार, दि. २९ मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता ' मग तू मला खा'हे नाटक सादर होणार आहे. लेखन व दिग्दर्शन विभावरी देशपांडे यांनी केले आहे. या नाटकात अनन्या रत्नपारखे, दीप मेहंदळे, गौतमी अहेर , वेदांत रानडे, हर्षद राजपाठक, ऋचा आपटे यांचा अभिनय पाहायला मिळणार आहे. तर रविवारी दुपारी अडीच वाजता 'तो राजहंस एक ' हे नाटक होणार आहे. या नाटकाचे लेखक दत्ता पाटील हे असून दिग्दर्शन सचिन शिंदे यांनी केले आहे. या नाटकामध्ये प्राजक्त देशमुख, अमेय बर्वे, धनंजय गोसावी, हेमंत महाजन व अनिता दाते हे कलाकार आपले कलाविष्कार सादर करणार आहेत. प्रत्येक नाटकांच्या सादरीकरणानंतर त्यातील कलाकार, लेखक , दिग्दर्शक व मानसोपचार तज्ञ यांचे चर्चासत्रही होणार आहे. त्यामध्ये मानसिक आरोग्याचे विविध पैलू उलगडले जाणार आहेत. हा नाट्यमहोत्सव विनामूल्य असला तरी त्यासाठी आगाऊ नोंदणी करणे व प्रवेश पत्रिका असणे बंधनकारक असल्याचे डॉ. मिलिंद पोतदार यांनी सांगितले. या नाट्य महोत्सवाचे आयोजक सोसायटी फॉर वेलबिइंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन (स्वर), अंतरंग व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र आणि सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च सेंटर हे आहेत.

डॉ. राम बोरगावकर यांना संगीतरत्न पुरस्कार प्रदान



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : मानव सेवा प्रतिष्ठान शेल्हाळ ता. उदगीर येथे आयोजित राज्यस्तरीय भजन स्पर्धा महोत्सवात लातूरचे ज्येष्ठ संगीतज्ज्ञ तालमणी डॉ. राम बोरगावकर यांना मानव सेवा प्रतिष्ठानच्या वतीने पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संस्थांनचे सहअध्यक्ष ह. भ. प. गहिनीनाथ महाराज औसेकर व माजी मंत्री, आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते राज्यस्तरीय संगीतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश लांडगे, उपाध्यक्ष हंसराज हुलसुरे, उदगीरचे तहसीलदार राम नागोराव बोरगावकर, उदगीरच्या नगराध्यक्षा स्वाती हुडे यांचेसह मानव सेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. त्या पुरस्काराबद्दल तुकाराम पाटील, प्रा. शिवराज मोटेगावकर, संदिपान माने, वनिता काळे, अँड.दासराव शिरुरे, प्राचार्य बाबुराव जाधव, प्राचार्य निलेश राजेमाने, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्राचार्य डॉ. गोरे, डॉ. पवार, डॉ. शिंदे यांचेसह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

लातुरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : येथील श्री संत ज्ञानेश्वर विकास मंडळाच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २६ मार्च ते ३ एप्रिल यादरम्यान विविध कार्यक्रम होणार आहेत. कलश स्थापना हभप रामकृष्णाचार्य महाराज हलगरकर यांच्या हस्ते होणार आहे. ज्ञानेश्वरीचे पारायण हभप धनराज महाराज डोंगरगावकर तर विष्णूनामजप हभप नरसिंह गोविंदराव गोणे हे करणार आहेत. २६ मार्च रोजी हभप मोहनदास महाराज हिप्परगे यांचे कीर्तन, हभप जयश्री मोरे यांचे प्रवचन होणार आहे. या सप्ताहात हभप बंडा महाराज अलगरवाडीकर, चंद्रशेखर महाराज देगलूरकर, चांगदेव महाराज गुंडाळे आलंदी देवाची विठ्ठल महाराज दिवेगावकर, धनंजय महाराज जोशी शेगाव, अविनाश महाराज रुबदे यांचे कीर्तन तर आचार्य यशपाल पाटील, सुगावकर, वेणूमाधव जोशी, ज्ञानोबा माऊली महाराज मळवटी, संभाजी पांचाल, गणपतराव ब बाजुळगे महाराज यांचे प्रवचन होणार आहे. ग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथ मिरवणूक १ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता निघणार आहे. २ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम त्यानंतर हभप ी सलगरकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

ह. भ. प. गुरूबाबा महाराज यांच्या कीर्तनास भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : शहरा-तील प्रकाशनगरमधील श्री दत्त मंदिर येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात ह.भ.प. गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या कीर्तनास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बुधवार, दि. २५ मार्च रोजी रात्री ८.१५ वाजता पार पडलेल्या या कीर्तनात मोठ्या संख्येने भक्तांनी उपस्थित राहून हरिनामाचा लाभ घेतला. गुरुबाबा महाराजांनी आपल्या ओजस्वी वाणीने, अभंग-भजनांच्या सादरीकरणातून आणि प्रभावी निरूपणातून उपस्थितांना अध्यात्मिक संदेश दिला. त्यांच्या कीर्तनादरम्यान संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. भक्तिमय वातावरणात भाविकांनी तल्लीन होऊन सहभाग नोंदविला. दि.



२३ मार्च २०२६ पासून सुरू झालेला हा अखंड हरिनाम सप्ताह दि. ३० मार्च २०२६ पर्यंत चालणार असून या सप्ताहाचा समारोप दि. ३० मार्च रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत होणाऱ्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

या धार्मिक सोहळ्याचे आयोजन अध्यक्ष ज्ञानोबा साळुंके व उपाध्यक्ष दादासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून या उपक्रमात नेताजी साठे, रामकृष्ण धोत्रे, रामदास सारगे, डी. व्ही. कुलकर्णी, राजकुमार रोंगे, सतीश साळुंके, मोहन सूर्यवंशी, धर्मेंद्र शिंदे, ज्ञानेश्वर कातळे, तुकाराम साळ-के, सूर्यकांत गुठे, पांडुरंग देशमुख, संतोष माने, बापू सारोळकर, मधुकर नागरगोजे, अॅड. पांडुरंग घोडके, अॅड. राजेंद्र काळे, उमाकांत गोरे, अंकुश कदम, गोविंद थोरात, रामराव शिंदे, निवृत्ती साळुंके, सोपानराव साळुंके, रावसाहेब जाधव, बळीराम गिराम, दिगंबर माळी, अभंग चव्हाण, गोरख लोखंडे, अतुल माने, धनंजय शिंदे, गजानन साळुंके, श्रीकांत कातळे, धनंजय अवस्कर, पिंटू वनारसे, संतोष यादव, योगेश इंगळे, शिवराज मुंडे, शक्ती थळकरी, रोहना अलमले, कादरे, वाडकर आदींचा सहभाग आहे.

उष्माघात टाळण्यासाठी उपाययोजना आवश्यक

उन्हाळ्यातील वाढत्या तापमानात 'आरोग्य' सांभाळा...!

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ मार्च : सध्या वा-तावरणातील होणाऱ्या बदलामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे हवामान खात्याच्या अंदाजानुसार मार्च महिन्यापासुनच आपण राज्यातील अनेक भागात तापमान वाढताना पाहत आ-होत. सर्व साधारणपणे एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ अंश सेल्शियसने जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात किंवा सलग दोन दिवस एखाद्या भागात तापमान ४५ अंश सेल्शियस पेक्षा जास्त असेल तर त्याभागात उष्णतेची लाट आली असे म्हटले जाते. सर्वसाधारणपणे सन बर्न, हिट क्रैम्प्स (उष्णतेमुळे स्नायुंना गोळे येणे), हिट एग्जोर्शन (उष्णतेमुळे प्रचंड थकवा), हिट स्ट्रोक (उष्माघात) यांसारखे प्रामुख्याने उष्णताविकार असून साधारण एप्रिल, मे या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होत असतो. त्यामुळे आरोग्य सांभाळा, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहेत. टाळण्यासाठी उष्माघात प्रतिबंधात्मक

उष्माघाताची लक्षणे ?

। किरकोळ त्रासात उष्णतेमुळे थकवा येणे, ताप येणे, शरीरावर रॉश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसून येतात. । गंभीर त्रासात उष्माघात होऊन त्वचा गरम व कोरडी पडणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, नाडीचे ठोके वेगात व जोऱ्यात असणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुध्द अवस्था अशा लक्षणासह मृत्यूही होऊ शकतो.

उपाय म्हणून पुर से पाणी प्या, प्रव-ासात पाणी सोबत ठेवा, हलक्या वजनाचे फिकट रंगाचे (पांढरे) सैलसर कपडे वापर. उन्हात चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणे वापर, ओलसर पडदे (वाळ्याचे), पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा. शक्य असल्यास उन्हात जाण्यापुर्वी सनस्क्रिन क्रिम वापरा किंवा कोरफडीचा गर लावा. शरबत किंवा जलसंजीवनीचा वापर करा. तसेच कष्टाची कामे उन्हात करू नका. शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाने टाळा. लहान मुलांना पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नका. गडद रंगाचे तंग कपडे वापरू नका, मद्यपान, चहा, कॉफी, सॉफटड्रीक टाळा. खुप प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या काळात भर दुपारी स्वयंपाक करणे टाळा, स्वयंपाकघर हवेशीर ठेवा,

उन्हाचा त्रास झाल्यास रुग्णास उष्माघातासाठी अती जोखमीचे घटक उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृद्ध व्यक्ती व लहान मुले, गरोदर महिला, स्थूल व्यक्ती व पुरेशी झोप न झालेले व्यक्ती, मधुमेह, हृदयविकार, दारूचे व्यसन असणारे लोक, घट्ट कपडे घातले-ले लोक, निराश्रीत, घरदार नसलेले गरीब लोक, कारखान्यात बॉयलर जवळ काम करणारे लोक, अशा अत्ति जोखमीच्या लोकांना उष्माघाताचा धोका असून विश-ेषतः त्यांनी उष्णतेच्या लाटेदरम्यान विशेष काळजी घेतली पाहीजे. उष्णतेमुळे होण-ारा शारीरिक त्रास किरकोळ स्वरूपाच्या किंवा गंभीर स्वरूपाचा असतो.

वावानुकुलीव खोलीत ठेवावे अथवा



हवेशीर खोलीत ठेवावे. खोलीत पंखे कुलर ठेवावे. रुग्णाचे तापमान खाली

प्रतिबंधात्मक उपाययोजना

उन्हाळ्यात पुरेसे पाणी प्या, प्रवासात पाणी सोबत ठेवा, हलक्या वजनाचे फिकट रंगाचे (पांढरे) सैलसर कपडे वापर. उन्हात चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणे वापर. ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा. शरबत किंवा जलसंजीवनीचा वापर करा.

आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. आईसप्याक लावावेत, रुग्णाला जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जावे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व इतर शासकीय दवाखान्यात उन्हाळाच्या पूर्वतयारी अनुषंगाने आरोग्य विभागामार्फत उष्माघात कक्ष स्थापना, मुबलक औषधी सा ठा उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी प्रशिक्षण, आरोग्य शिक्षण, जनजागृती इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या रिसिश-३ २६ चरी २०२६ असून ग्रामीण आरोग्य यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवण्यात आलेली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आगामी दिवसांमध्ये जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, अशा परिस्थितीत विविध उष्णताविकार अथवा उष्माघात होऊ नये यासांठी नागरिकांनी आता पासूनच सजग रहावे व प्रतिबंधात्मक उपायावर अधिक भर द्यावा, तसेच उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राहुलकुमार मीना, आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा नोडल अधिकारी डॉ सुनील भागवत यांनी केले आहे.

आगामी दिवस धोक्याचे

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आगामी दिवसांमध्ये जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, अशा परिस्थितीत विविध उष्णताविकार अथवा उष्माघात होऊ नये यासांठी नागरिकांनी आता पासूनच सजग रहावे व प्रतिबंधात्मक उपायावर अधिक भर द्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुनील भागवत यांनी केले आहे.

CMYK
ूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
ोय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
ा संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
ा व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
क) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/

संक्षिप्त...

सरकारने यशवंतवाडीच्या तकऱ्याला न्याय मिळवून द्यावा

मा वृत्तसेवा
दि. २६ मार्च : तालुक्यात्तील यशवंतवाडी लातूर मधील रेणापूर येथील रहिवासी ज्योतीराम साह वराव या शेतकरी बांधवाने शेताकडे जाणारा रस्ता भाजपच्या क आमदाराच्या दबावामुळे खुला करून दिला जात हणून विधानभवनासमोर अंगावर पेट्रोल ओतून ह्न करण्याचा मंगळवारी प्रयत्न केला. या घटनेची आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी तातडीने दखल सरकारने शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री यांच्याकडे केली.
राम साहेबराव चव्हाण
आमदार धिरज देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी यशवंतवाडी येथे वडिलोपार्जित शेतजमीन आहे. पण डे जाण्यासाठी रस्ता नसल्याने तो करून मिळावा, ो चव्हाण अनेक दिवसांपासून पाठपुरावा करत आहेत. करून द्यावा याबाबत सरकारने दिलेले असतानाही त्याबाबत कार्यवाही केली जात 'आमचे हात बांधलेले आहेत', असे प्रशासन उत्तर देत म्हणून चव्हाण यांनी आज टोकाचे पाऊल उचलले. भवनासमार अंगावर पेट्रोल ओतून रेणापूर येथील ो बांधवाने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. हे वृत्त य वेदनादायी व मनाला चटका लावणारे आहे. एका ो बांधवांवर आत्मदहन ाची वेळ यावी ही घटना महाराष्ट्रासाठीच अत्यंत ायक आहे. या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी व शेतकरी बांधवाला नाहक मनस्ताप देणाऱ्या र कारवाई करावी, अशी मागणी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र वीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मी असे माजी आमदार धिरज देशमुख यांनी सांगितले.

मिक आरोग्यकेंद्रात एच.पी.व्ही लसीकरण



भा वृत्तसेवा
, दि. २६ मार्च : तालुक्यातील पोहरेगाव प्राथमिक केंद्र येथे एच.पी.व्ही.या लसीकरण मोहीमेस सुरुवात ात आली.
र्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्या मनीषाताई ह कदम या होत्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोहरेगाव ायतीच्या प्रथम नागरिक सरपंच श्रीमती ज्योतीताई मोरे उपस्थिती होती एच.पी.व्ही.लसीकरण मोहिमेअंतर्गत क आरोग्य केंद्र,पोहरेगाव कार्यक्षेत्रातील एकूण २२ तांडे,वाडी,वस्त्या) यातील एकूण २२२ लाभार्थीचे प्याने पुढील ३ महिन्यात एच.पी.व्ही.लसीकरण होणार लसीबाबत कोणताही गैरसमज मनात न ठेवता १४ र्ग ते १५ वर्ष वयोगटातील मुलींनी ही अत्यंत सुरक्षित शियाच्या मुख कर्करोगापासून रक्षण करणारि ही लस ाचे पोहरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय ारी डॉ.भालचंद्र चाकूरकर यांनी सांगितले.
कार्यक्रमास प्राथमिक अरोग्य केंद्र पोहरेगाव अंतर्गत सर्व य आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक,आरोग्य सेविका व कार्यकर्ती यांची उपस्थिती होती.तसेच या कार्यक्रमा मुख पाहुण्याच्या हास्ते आयुष्मान आरोग्य कार्डचे र्थांना वितरण करण्यात आले.

राम मंदिर कलशारोहण, मुर्ती स्थापना ,लक्ष्मण शक्तीचे आयोजन...



त्तसेवा
अनंतपाळ दि. २६ मार्च : ईश्वर कृपेने व रायाच्या इच्छेने मौजे होंडाळा येथे श्रीराम मंदिर रोहण, मुर्ती स्थापना श्री संत महंत गुरुवर्य एकनाथ महाराज उम्रजकर यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या तीत मिती चैत्र शुद्ध ७शके१९७८वार बुधव– २५/३/२०२६रोजी सकाळी ११ते०१ या वेळेत चंद्र प्रभुंच्या परिवारातील मुर्तीची अर्थात राम, लक्ष्मण, (जानकी),परम सेवक बजरंग बली यांच्या मुत– णप्रतिष्ठापना व मंदिराचा कलशारोहण सोहळा संपन्न संध्याकाळी ६ते दि.२६/३/२०२६ सकाळी ६ पर्यंत ा शक्तीचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी ९ते म.प.ज्ञानोबा माऊली महाराज अरबुजवाडीकर यांचे या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिलेले संत महंत एकनाथ नामदेव महाराज मठसंस्थान उम्रजकर, गुरुवर्य नराशाम महाराज मठसंस्थान येवती, शिवानंद ार्य महाराज तमलुरकर, सिद्धयाळ शिवाचार्य महार– ्मोगरेकर, वीरुपक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, नामदेव महाराज बारुळकर, गुरुवर्य ह.भ.प. नामदेव न दापकेकर, हभप.भानुदास महाराज वांजरवाडेकर, रमानंद महाराज हिप्परगेकर, हभप.गोपाळ महाराज ोकर, हभप.खंडेश्रवर महाराज सांगवीकर या प्रमुख ींच्या साक्षीने व कृपाशीर्वादाने हा सोहळा संपन्न झाला र्यक्रमाचे आयोजन होंडाळा नगरीतील हिंदू धर्म सेवक ी नारायणराव पाटील सुर्यवंशी यांनी केले होते.त्यांना ्या सहकार्य होंडाळा नगरीतील समस्त गावकऱ्यांनी एकत्र या कार्यक्रमाला सहकार्य केले .

ना . बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत 'जलतारा–पाणी परिषद' होणार



तभा वृत्तसेवा
चाकूर, दि. २६ मार्च : शेती आणि गाव पाणीदार करण्याच्या उद्देशाने सिद्धी शुगर ॲंड अलाईड इंडस्ट्रीज लि. उजना (ता. अहमदपूर) च्या वतीने दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता शहरातील दीपवर्षा मंगल कार्यालय येथे तर चाकूर येथील यशवंत मंगल कार्यालयात दिनांक २८ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता भव्य 'जलतारा–पाणी परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या वर्षी अहमदपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पाणी परिषदेला मिळालेले अपार यश आणि तालुक्यातील शेतकरी बांधवांचा मोठा प्रतिसाद व वाढती मागणी लक्षात घेता यावर्षीही या महत्त्वपूर्ण परिषदेचे नियोजन अहमदपूर व चाकूर या दोन्ही शहरात करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बाळासाहेब जाधव हे उपस्थित राहणार आहेत.

या पाणी परिषदेचे मुख्य आकर्षण म्हणजे 'जलतारा' प्रकल्पाचे जनक प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ हे स्वतः उपस्थित राहून शेतकरी बांधवांना सखोल मार्गदर्शन करणार आहेत. आपल्या शेतात जलतारा प्रकल्प नेमका कसा राबवावा आणि त्या माध्यमातून विहिरी तसेच कूपनलिकेची (बोर) पाणीपातळी कशी वाढवावी, यावर ते तांत्रिक व प्रयोगात्मक माहिती देणार आहेत. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आणि शाश्वत शेतीसाठी ही परिषद अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

या परिषदेच्या यशस्वीतेसाठी सिद्धी शुगरचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश बाळासाहेब जाधव, संचालिका दीपाली अविनाश जाधव, सुरज बाबासाहेब पाटील (पी.जी. सन्मान), जनरल मॅनेजर केन पी.एल. मिटकर आणि दिनदार यांच्यासह सिद्धी शुगरचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. अहमदपूर तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या शेतातील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी आणि गाव समृद्ध करण्यासाठी या जलतारा पाणी परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जि. प. अध्यक्ष, उपाध्यक्षांकडून कामाचा आढावा

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २६ मार्च : जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्षांकडून अजून जिल्हा परिषदेच्या कामाचा आढावा घेतला जात नसल्याचे दिसत असून, हे पदाधिकारी सध्या सत्कार कार्यक्रमातच व्यस्त आहेत. सभापती निवडीनंतर अध्यक्ष, उपाध्यक्ष कामाचा आढावा घेतील, असे सांगण्यात आले.

गेल्या १६ मार्च रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड झाली. या निवडीनंतर लगेच पदाधिकारी कामाची माहिती घेऊन सक्रिय होतील, असे म्हटले जात होते. परंतु, सभापती निवड ३० मार्च रोजी होणार

असल्याने अध्यक्ष, उपाध्यक्षांनी पंधरा दिवस वाट पाहून किंवा अंदाज घेऊन नंतर कामास सुरूवात करावी, असे ठरवले असावे. हल्ली पदाधिकारी सत्कार कार्यक्रमातच व्यस्त

अध्यक्ष, उपाध्यक्षांची कार्यालयात हजेरी अधूनमधून लागत असली तरी प्रत्यक्ष जोरकस कामास आणखी सुरूवात झालेली नाही. निवडीनंतर सत्कार कार्यक्रम यात बहुतांशी

वेळ जात असल्याची चर्चा आहे. पदाधिकारी आल्याने जिल्हा परिषदेत अभ्यंगतांची वर्दळ वाढली. परंतु, पदाधिकाऱ्यांनी कामास अजून सुरूवात केल्याचे दिसत नाही. पदाधिकारी बाहेरच्या स्त्रोताकडून जिल्हा परिषद प्रशासनाची माहिती करून घेत असावेत. आणखी चार–पाच दिवसांनी जिल्हा परिषदेत पदाधिकारी पूर्णवेळ थांबून काम पाहतील. सध्या सभापती निवड तसेच त्यांचे सहाय्यक निवड करणे सुरू आहे. यामुळेही पदाधिकाऱ्यांनी आढावा घेतला नसावा, अशी चर्चा आहे.

प्रा तानाजी भोसले यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २६ मार्च : स्विफ्टन लिफ्ट एज्युकेशन मीडिया पुणे चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत बचत गटाचे अध्यक्ष प्रा तानाजी भोसले यांचा लातूर येथे सत्कार करण्यात आला.
प्रा. तानाजी भोसले हे संत कबीर प्रतिष्ठानचे नियमक मंडळ सदस्यही आहेत.
प्रा. तानाजी भोसले यांनी गावभागातील मागास विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. राष्ट्र भाषा हिंदीचा प्रसार प्रचार आदि कार्यात सहभाग नोंदवला याबद्दल पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत बचत गटाचे उपाध्यक्ष पांडुरंग देडे, मार्गदर्शक प्राचार्य आर. डी.निटू रकर, सल्लागार व्यकट बिराजदार आदींनी त्यांचा सत्कार केला व भावी कार्यास शुभेच्छा दिल्या..

कचरा उचलण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २६ मार्च : शहरातील प्रभाग क्र. १३ मधील रहिम नगर भागात रिंग रोडलगत टाकण्यात आलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी वाढली आहे. या भागातील पाण्याचा निचरा होत नसल्याने गेल्या चार ते पाच वर्षांपासून पाण्यात कचरा टाकला जात होता. रिंग रोडलगत नवीन नाली बांधकाम झाल्यामुळे या भागातील पाण्याचा निचरा होत आहे. मात्र या ठिकाणी पडलेल्या कचऱ्याचे ढिग दुर्गंधीला कारण ठरत आहे. महापालिका प्रशासनाने गेल्या अनेक दिवसांपासून पडलेला हा कचरा तातडीने उचलावा, अशी मागणी या भागातील नागरिकांतून होत आहे. पाणी निचरा झाल्याने कचऱ्याचे ढिग दिसत आहेत. त्यामुळे स्वच्छता विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.

विळेगाव येथे अफूची लागवड , शेतकऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
किनगाव दि. २६ मार्च : अहमदपूर तालुक्यातील विळेगाव येथील एका शेतकऱ्याने स्वत:च्या शेतात प्रतिबंधित असलेल्या अफूच्या झाडांची लागवड करून त्याचे संगोपन सुरू केले होते. किनगाव पोलिसांना याची माहिती मिळताच मंगळवारी (दि.२४) रात्री ९.५० वाजता किनगाव पोलिसांनी धाड टाकून १४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. मागील आठ दिवसांपूर्वीच लातूर तालुक्यातील गोंदेगाव शिवारात उसाच्या पिकात गांजाचे आंतरपीक घेतलेल्या ठिकाणी धाड टाकण्यात आली होती., आता किनगाव पासून काही अंतरावर असलेल्या विळेगाव मध्ये अफूची शेती सापडली आहे.
अहमदपूर तालुक्यातील विळेगाव येथील अशोक निवृत्ती चिंचोलकर यांनी त्यांच्या गट क्रमांक २३१ शेतात प्रतिबंधित असलेल्या अफूच्या १९ झाडांची लागवड करून त्याचे संगोपन सुरू केले होते . किनगाव पोलिसांना माहिती मिळताच अफूच्या झाडांची एकूण १४० ग्रॅम वजनाची २६ बोंडे किंमत प्रति ग्रॅम १०० रुपये प्रमाणे असा एकूण १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तानाजी वळुमपल्ले यांच्या फिर्यादीवरून किनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हा नंबर ६७/२६ कलम ८ (क),१८ गुंगीकारक औषधी द्रव्ये मानवी शरीरावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके हे करत आहेत .

जि. प. विषय समिती सभापतींची ३० ला निवड कोणाला संधी मिळणार?



तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २६ मार्च : लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीचा विषय मार्गी लागल्या नंतर विषय समित्या निवडीचा विषय ऐरणीवर आला आहे. सोमवार दि. ३० मार्च रोजी विषय समिती सभापतींची निवड प्रक्रीया पार पडणार आहे. भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा जि. प. सत्तेचा ५०–५० टक्के वाटा असल्याने कोणाला किती समित्या मिळणार याची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.

लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची निवड प्रक्रीया सोमवार दि. १६ मार्च रोजी पार पडली. यात जि. प. च्या अध्यक्षपदी उषा पाटील, तर उपाध्यक्ष पदी दयानंद सुरवसे यांची निवड समित्यांसाठी ५०–५० टक्के फॉर्म्युला कायम

लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीत भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेसचा सत्तेचा वाटा ५०–५० टक्के प्रमाणे आता विषय समिती निवडीच्यावेळीही हाच फार्मुला कायम राहणार असल्याची चर्चा सध्या होताना दिसून येत आहे. समाज कल्याण, महिला व बालकल्याण, बांधकाम व आरोग्य, कृषि व पशुसंवर्धन, शिक्षण व अर्थ समिती–वर दोन्ही पक्षांच्या नेत्यांचा डोळा आहे. तसेच कांही नाराज सदस्यांना वजनदार खाते मिळणार अशीही चर्चा होत आहे.

प्रक्रीया पार पडली. यानंतर प्रशासनाचे पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रोहिनी नन्हे यांनी जिल्हा परिषदेच्या चार विषय समिती सभापती निवडीचा कार्यक्रम जाहिर केला हे. पिठासीन अधिकारी यांनी जिल्हा परिषदेचे ५९ सदस्य आणि सर्व १० पंचायत समितीचे सभापती यांना नोटीस पाठवून सोमवार दि. ३० मार्च रोजी विषय समिती सभापती पदासा आठी निवडणूक प्रक्रीया पार पडणार असल्याचे कळवण्यात आले आहे. लातूर जिल्हा परिषदेच्या

१५ एप्रिलपर्यंत सर्व समित्यांच्या सभापती निवडी होतील

लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची निवड दि. १६ मार्च रोजी पार पडली. अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या निवडीनंतर महिनाभराच्या आत सर्व विषय समित्यांच्या सभातींची निवड होऊन सदर समितीच्या सदस्यांव्याही निवडी ठरलेल्या नियमानुसार पार पडणे आवश्यक आहे. दि. ३० मार्च रोजी चार समित्यांच्या सभापतींची निवड होऊन समाज कल्याण, महिला व बालकल्याण सभातींना पदभार दिला जाणार आहे. तसेच उर्वरित दि. १३ किंवा १५ एप्रिल पर्यंत सर्व समिती सभापती व सदस्यांच्या निवडी पार पडणार आहेत. यावेळीच कोणाला कोणते सभातीपद दिले जाणार हे ठरणार आहे.

यशवंतराव चव्हाण सभागृहात सोमवार दि. २० मार्च रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत समाजकल्याण, महिला व बालकल्याण समितीच्या बरोबरच इतर दोन सभापतींची अशा प्रकारे चार विषय समिती सभापतींची निवड प्रक्रीया पार पडण्यासाठी नामनिर्देशनपत्र स्विकारले जाणार आहेत. दुपारी २ वाजता सभेस सुरुवात होणार आहे. सभेत उमेवारी मागे घेणे, उर्वरीत उमेदवारांची नावे घोषित करून विरोधी पक्षाकडून नामनिर्देशनपत्र आल्यास मतदान घेतले जाणार आहे. त्यानंतर निकाल जाहिर केल्यानंतर सभेचे कामकाज चालणार आहे.

ऑनलाईन लॉटरी जुगाराविरोधात विशेष पथकाची कारवाई

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २६ मार्च :

लातूर जिल्ह्यात अवैध जुगार, मटका व ऑनलाईन लॉटरीच्या माध्यमातून सुरू असलेल्या बेकायदेशीर व्यवसायांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाद्वारे सातत्याने मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत अहमदपूर शहरात गुप्त माहितीच्या आधारे नियोजनबद्ध कारवाई करत मटका व ऑनलाईन लॉटरी जुगार चालविणाऱ्या ठिकाणांवर सलग छापेमारी करण्यात आली.

सदर कारवाईदरम्यान भाजी मार्केट, मारोती मंदिर परिसर तसेच मटन मार्केट परिसरात लक्ष केंद्रीत करून तीन वेगवेगळ्या ठिकाणी धाड टाकण्यात आली. या वेळी आरोपी हे लोकांकडून पैसे स्वीकारून मोबाईल व संगणकाच्या सहाय्याने मिलन डे, प्ले गेम, फन टार्गेट अशा विविध नावांनी मटका व ऑनलाईन लॉटरी जुगार चालवत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी सुरज हिरालाल राउत्रे ,गोपीचंद राजकुमार भगत, सुनिल रामराव गायकवाड या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समाज माध्यमांचा समाज हितासाठी सकारात्मक वापर करावा : डॉ. संजय गवई



तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २६ मार्च :
आज प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाचा दैनंदिन जीवनामध्ये मोठ्या प्रमाणात वापर होत आहे परंतु यासर्व समाज माध्यमांचा समाजहितासाठी वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील प्रोफेसर डॉ.संजय गवई यांनी केले.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवक–युवती नेतृत्व विकास शिबिरात ते समाज माध्यमांचा सकारात्मक वापर या विषयावर प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.
या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रो.(डॉ.) राजाभाऊ पवार हे होते तर विचारमंचावर कार्यक्रमाधिकारी प्रो.(डॉ.)प्रमोद चव्हाण, डॉ. अरुण साळुंखे आणि डॉ.समीना शेख उपस्थित होते.
पुढे बोलताना डॉ.गवई म्हणाले की, समाज माध्यमांचे प्रमुख तीन प्रमुख प्रकार आहेत यामध्ये प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडिया यांचा समावेश होतो. सोशल मीडियाचा सुजाण वापर केल्यास शिक्षण, व्यवसाय, संवाद आणि समाजजागृती यासाठी ते अत्यंत प्रभावी साधन ठरू शकते. आजच्या डिजिटल युगात तरुणांना रील्स, व्हिडिओ आणि विविध डिजिटल कंटेंट तयार करून उत्पन्नाचे नवे मार्ग उपलब्ध झाले आहेत. मात्र, या माध्यमाचा वापर करताना जबाबदारी, सत्यता आणि नैतिक मूल्यांचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रो.(डॉ.)राजाभाऊ पवार म्हणाले की, समाज माध्यम हे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्याचे नमूद करत, त्याचा वापर समाजहित आणि जनजागृतीसाठी करण्याचे आवाहन Ho$bo.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.समीना शेख यांनी केले, तर सूत्रसंचालन विद्यार्थी नरेश चामले यांनी तर आभार डॉ.अरुण साळुंखे यांनी मानले.
या व्याख्यानाला महाविद्यालयातील शिक्षक आणि सहभागी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक–स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त टाकळगाव येथे मोफत आरोग्य शिबिर



तभा वृत्तसेवा
लातूर दि. २६ मार्च : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर तालुक्यातील टाकळगाव येथे रविवार, २९ मार्च रोजी भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल ॲंड क्रिटिकल केअर सेंटर, धन्वंतरी हॉस्पिटल, जाधव हॉस्पिटल, आशा आरोग्यधाम आणि तांदूळजा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य शिबीर टाकळगाव येथे रविवार, २९ मार्च रोजी सकाळी १० ते २ वाजता पर्यंत होणार आहे.

तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग या आरोग्य शिबिरात नामवंत डॉक्टरांचा चमू रुग्णांची तपासणी करणार आहे. यामध्ये प्रामुख्याने: गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल ॲंड क्रिटिकल

केअर सेंटरचे डॉ. रमेश भराटे, धन्वंतरी हॉस्पिटल डॉ. मनोज भडके, डॉ. पल्लवी भडके, जाधव हॉस्पिटल डॉ. सौरभ जाधव, डॉ. मेघा जाधव, स्वामी रामानंद तिर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाइचे डॉ. महेश कदम, डॉ. शंकरराव धपाटे, आशा आरोग्यधाम डॉ.व्ही. व्ही.घवले, प्राथमिक आरोग्य केंद्र तांदुळजा येथील डॉ. व्यवहारे, डॉ. स्वाती डोलारे यांसह अन्य तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश आहे.

टाकळगावसह तांदूळजा, सारसा, भोसा, निळकंठ, वांजरखेडा आणि परिसरातील इतर गावांमधील नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिराचे आयोजन टाकळगावचे उपसरपंच निवृत्ती देवणे, शिवतेज प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष मनोज पवार, युवक काँग्रेस अध्यक्ष अमोल कदम, व्हा. चेअरमन धनंजय शिंदे, नितीन भिसे, संजय शिंदे आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे. वाढदिवसानिमित्त राबवण्यात येत असलेल्या या विधायक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रेमाच्या जाळ्यात ओढले, लाखोंना लुटले

तभा वृत्तसेवा
लातूर दि. २६ मार्च : एका महाविद्यालयीन तरुणीच्या मागे लागत, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिच्यावर वारंवार बलात्कार करून पीडितेचे १३ तोळे सोन्यासह लाखो रुपयांना लुटल्याप्रकरणी नराधम आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
आरोपी खुर्शीद अफसर पटवारी (रा. हडको कॉलनी, एमआयडीसी, लातूर) याने २०१८ मध्ये पीडित महाविद्यालयीन तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिच्यासोबत बलात्कार केला. त्यानंतर तिची बदनामी करण्याची धमकी तिला देऊ लागला. यातून आरोपी खुर्शीद पटवारी याने पीडितेकडून १३ तोळे सोने, गरज पडल्यानंतर लागतील असे रोख १ लाख २ज हजार रुपये व पीडितेच्या नावे २२ लाख रुपयांचे बँकेचे कर्ज काढून ते पैसे त्याच्या खात्यावर वळवून घेतले. ऑगस्ट २०१८ पासून जानेवारी २०२५ पर्यंत त्याचा हा त्रास पीडितेला सुरूच होता. अलिकडील काही दिवसांपूर्वी पीडिता ही लातूरला आली की, तिच्याकडून पैसे उकळण्यासाठी तिची बदनामी करण्याची धमकी देत होता. लग्नाचीही मागणी अलिकडच्या काळात त्याच्याकडून होऊ लागली होती. त्याच्या या त्रासाला कंटाळून पीडितेने आरोपी खुर्शीद अफसर पटवारी याच्याविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून गुरनं. १४४/२६ कलम ६४ (१), ३५१ (३), ३०८ (५), ३१८ (४) भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव सानप हे करीत आहेत.

अग्रलेख...

...असे 'डबल ढोलकी' शोधून काढा!

समजा, १०० मीटर धावण्याची शर्यत आहे. काही धावपटूंकडे उत्तम प्रशिक्षण आहे. जोरात धावण्याकरिता मदत करणारे चांगले जोडे आहेत. उलट, शर्यतीतील काही जण अनवाणी आहेत. शिवाय त्यांना नीट जेवणही मिळालेले नाही. अशा वेळी या सर्वांना सरसकट एका रेषेत उभे करणे अन्यायकारक ठरेल आणि म्हणून ज्यांच्याकडे आवश्यक सोयी नाहीत, त्यांना शर्यतीत थोडे पुढे उभे करणे म्हणजे सोप्या भाषेत 'आरक्षण'! भारताच्या सामाजिक आणि घटनात्मक संरचनेत अशा वर्गांसाठी लागू करण्यात आलेले आरक्षण हे केवळ आर्थिक सबलीकरणाचे साधन नसून, ते शतकानुशतके सोसलेल्या सामाजिक विषमतेच्या जखमेवरील फुंकर आहे. त्यांची ती जखम बरी व्हावी म्हणून त्यांना दिलेला मदतीचा हात आहे. मात्र, स्वार्थासाठी धर्मांतर करूनही आपल्या मूळ जातीच्या आरक्षणाचे फायदे लाटणारे डबल ढोलकी बडविणारे लोकही आहेतच. अशा लोकांचे पराक्रम पाहता, सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिलेला निकाल अत्यंत महत्त्वाचा आणि दिशादर्शक असा आहे. न्यायालयाने अगदी स्पष्ट केले आहे की, एखादी व्यक्ती ख्रिश्चन धर्म स्वीकारत असेल आणि त्याचे सक्रिय पालन करीत असेल, तर ती व्यक्ती 'अनुसूचित जाती' प्रवर्गाचे लाभ घेण्यास पात्र ठरत नाही. तसा हा निर्णय अगदीच नवा नाही. ही १९५० च्या घटनात्मक आदेशाची केलेली योग्य आणि परखड मांडणी आहे. उशिरा का असेना, पण आता त्याबाबतची स्पष्ट व्याख्या समोर आल्याने अशा प्रकारावर आळा बसेल, अशी आशा करू या.

या वादाच्या मुळाशी गेल्यास, संविधानातील (अनुसूचित जाती) आदेश १९५० च्या कलम ३ मध्ये अत्यंत स्पष्टपणे नमूद केले आहे की, हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्माचा स्वीकार करणारी व्यक्ती अनुसूचित जातीची मानली जाणार नाही. घटनेत ही तरतूद अतिशय विचारपूर्वक करण्यात आली होती. अनुसूचित जातीचा दर्जा हा प्रामुख्याने 'अस्पृश्यता' या तत्कालीन कुप्रथेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक मागासलेपणावर आधारित होता. जेव्हा एखादी व्यक्ती ख्रिश्चन किंवा इस्लामसारखा धर्म स्वीकारते तेव्हा, ती व्यक्ती सैद्धांतिकदृष्ट्या अशा धर्मात प्रवेश करते जिथे 'जातिव्यवस्था' किंवा 'अस्पृश्यता' जवळजवळ नाही. किमान तसा दावा केला जातो. त्यामुळे धर्मांतर केल्यानंतर त्या व्यक्तीवरचा अस्पृश्यतेचा शिक्का आपसूकच पुसला जातो, असेच मानले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयानेही नेमक्या याच तांत्रिक आणि घटनात्मक मुद्यावर बोट ठेवले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यानंतर संबंधित व्यक्तीला अनुसूचित जातीचे फायदे किंवा 'अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत' संरक्षण मिळू शकत नाही. त्यामुळे आता याबाबत शंका घेण्याचे काही कारण नाही.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या निकालाला कायम ठेवताना, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा आदेश एका विशिष्ट प्रकरणावर आधारित आहे. जिथे, ख्रिश्चन धर्म स्वीकारून पाद्री म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीने अनुसूचित जातीच्या सवलतींवरही दावा केला होता. तो न्यायालयाने फेटाळला. या निकालामुळे एक मोठा कायदेशीर संभ्रम दूर झाला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, एखादी व्यक्ती स्वेच्छेने धर्मांतर करीत असेल, तर त्या धर्माच्या नियमानुसार आणि सामाजिक चौकटीत त्याला राहावे लागेल. ख्रिस्ती धर्मात अधिकृतपणे 'जातिव्यवस्था' अस्तित्वात नसल्यामुळे, तिथल्या अनुयायांना हिंदू धर्मातील सामाजिक उतरंडीवर आधारित आरक्षण मागण्याचा कोणताही नैतिक किंवा कायदेशीर अधिकार उरत नाही. या मुद्याकडे लक्ष वेधले जाण्यास थोडा उशीर झाला खरा. कारण अनेक दशकांपासून अनेक धर्मांतरित व्यक्ती दुहेरी लाभ घेत आहेत. आपल्या आसपास ते स्पष्टपणे दिसतेही. अनेक पाद्रींची नावे बघितली तरी ते स्पष्ट होते. त्यामुळे तशा तक्रारी येतच होत्या. एकीकडे अल्पसंख्यक म्हणून मिळणाऱ्या सवलती आणि दुसरीकडे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र वापरून मिळणारे आरक्षणही, अशा दुहेरी लाभांमुळे खऱ्या अर्थाने गरजू असलेल्या आणि मूळ धर्मात राहिलेल्या अनुसूचित जातिबांधवांवर अन्याय होत आहे, हेही समजून घेतले पाहिजे. ख्रिश्चन धर्मात जाऊन आपले नाव बदलणे, त्या धर्मानुसार प्रार्थना करणे, आपण पुरोगामी झालो आहोत, असा प्रचार करणे आणि वरून ज्या धर्मातील अनुसूचित जातीतून आलो, त्या जातीच्या आरक्षणाचा आणि अन्य सुविधांचा लाभही घेत राहणे, हा दुटप्पीपणा समाजात अनेकांच्या बाबतीत घडताना दिसतो. आम्ही ख्रिश्चन झालो असलो तरी आमच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर अजूनही आमची हिंदू धर्मातील जात लिहिलेली आहे आणि त्यामुळे आम्ही त्याचा लाभ घेत आहोत, असा त्यांचा युक्तिवाद...!, जो खऱ्या अनुसूचित समुदायांतील व्यक्तींवर अन्याय करणारा ठरतो.

ख्रिश्चन धर्माचा प्रचार करताना, हा धर्म समतावादी आहे आणि तेथे उच्च-नीच भेदभाव नाही, असा दावा त्यांच्याकडून केला जातो. तसे ते खरे नाहीच. कारण 'कन्व्हर्टेड' ख्रिश्चनांना मूळ ख्रिश्चन न मानणे हाही एक प्रकारे भेदभावच आहे! तरीही या धर्मात भेदभाव नाही असे आपण गृहीत धरले, तर धर्मांतरित व्यक्तीने पुन्हा जातीच्या आधारावर आरक्षणाची मागणी करणे हा त्यांच्या नवीन धर्माच्या शिकवणीचाही अपमानच ठरेल की नाही? म्हणजे तेथेही धर्मनिष्ठा नाहीच! आधीची निष्ठा सोडायची, पण सवलती सोडायच्या नाहीत, ही केवळ स्वार्थी सोय म्हणावी लागेल. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने आपल्या निरीक्षणात स्पष्टच म्हटले की, ख्रिस्ती धर्मात जातीय व्यवस्था अस्तित्वात नाही. जर तिथे जातच नाही, तर मग अनुसूचित जातीचा दाखला कशासाठी?

धर्मांतर हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न असू शकतो, परंतु जेव्हा सार्वजनिक संसाधने आणि घटनात्मक संरक्षणाचा सवाल येतो, तेव्हा नियमांचे पालन होणे अनिवार्य असते. हिंदू धर्मातील जुन्या विषमतावादी प्रथांमुळे वंचित वर्गांना आरक्षण द्यावे लागले. तो त्यांना सामाजिक न्याय देण्याचा मुद्दा आहे. आता जर कुणी स्वेच्छेने दुसरा धर्म स्वीकारत असेल, तर त्याने जुन्या ओळखीचे किंवा जातीचे फायदेही त्यागले पाहिजेत. सातत्याने उकळत राहिलेल्या लाभांवर तुळशीपत्र ठेवले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या या स्पष्टीकरणानंतर आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात आहे. ज्या अनुसूचित जातीच्या हिंदूंनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आणि तरीही जे छुप्या पद्धतीने किंवा कागदोपत्री बदल न करता अनुसूचित जातीचे फायदे घेतच आहेत, अशा व्यक्तींना शोधले पाहिजे. ते अजिबात कठीण नाही. शोध घेतला की लाखोंच्या संख्येने असे दुटप्पी व स्वार्थी लोक समोर येतील. त्यासाठी सरकारने विशेष मोहीम राबवून जात जात प्रमाणपत्रांची फेरतपासणी करायला हवी. विशेषतः धर्मांतराचे प्रमाण मोठे असलेल्या भागांत हे केले पाहिजे. जे लोक असे दुहेरी लाभ घेत आहेत, त्यांच्या अनुसूचित जातीच्या सवलती तत्काळ प्रभावाने रद्द केल्या पाहिजेत. शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये अशा उमेदवारांच्या धार्मिक स्थितीची कडक तपासणी होणे आवश्यक आहे.

आरक्षण ही काही 'गरिबी हटाव' योजना नाही. ती एक सामाजिक न्यायाची लढाई आहे. जोपर्यंत एखादी व्यक्ती आपल्या मूळ पारंपरिक धर्मात आहे, तोपर्यंतच तिला त्या संरक्षणाची गरज असते. एकदा का धर्मांतर झाले की, जुन्या सामाजिक ओळखीचे कायदेशीर अस्तित्व संपुष्टात येते, हे आता सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहे. त्यामुळे, खऱ्या अर्थाने अनुसूचित जातीच्या सवलतींचा लाभ हा केवळ अशाच व्यक्तींना मिळाला पाहिजे, ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या मूळ धर्माशी आणि संस्कृतीशी फारकत घेतलेली नाही. जे लोक धर्मांतर करून केवळ स्वतःच्या लाभासाठी जुन्या जातीचा सर्रास वापर करीत आहेत, त्यांना शोधून काढले पाहिजे, त्यांच्या सुविधा संपुष्टात आणल्या पाहिजेत. आरक्षणास पात्र असलेल्या लोकांमधून अशा डबल ढोलकीवाल्यांची संख्या कमी झाली तर ते मूळ धर्मातील वंचित वर्गांच्या फायद्याचे असेल आणि तोच खऱ्या अर्थाने संविधानाचाही सन्मान ठरेल. ▮▮

प्रासंगिक

प्रसाद दत्तात्रेय पोफळी

मन मंदिरातील राम

सध्या सोशल मीडियाचे युग आहे. चोवीस तास माहितीचा भडिमार आणि क्षणाक्षणाला बदलणारे ट्रेंड्स यांच्या गराड्यात आपण जगत आहोत. अशा काळात रामायण काळातील, सत्ययुगातील रामचरित्राचे वर्तमान संदर्भात काय औचित्य? असा प्रश्न कधीकधी काही लोकांच्या मनात येतो.

''आजकाल ना कशातच राम राहिला नाही!'' कधी कधी उद्वेगाने आलेले निराशेचे असे उद्गार आपल्या कानावर अनेकदा पडतात. ''रामचंद्र कह गए सिया से ऐसा कलयुग आएगा, हंस चुगेगा दाना और कौआ मोती खायेगा'' एका गाण्यात प्रत्यक्ष श्रीरामांच्या तोंडी असलेल्या या ओळी आपल्याला प्रत्ययास येत आहेत असेही कधी कधी आपल्याला जाणवायला लागते. आणि आपण विचार करायला लागतो की खरंच आजकाल कशात रामच राहिला नाही!

असा विचार करीत असतानाच आज रामनवमीच्या दिवशी श्रीरामाच्या चरित्राचे, गीतरामायणाचे बोल आपल्या कानावर पडत असतात. आदर्श आणि व्यवहार यांचे द्वंद्व मनात सुरू असते. पण जर आपण श्रीरामांकडे केवळ एक दैवत म्हणून न पाहता एक आदर्श मनुष्य (मर्यादा पुरुषोत्तम) म्हणून पाहिले, तर या वर्तमान काळात जगताना तेच सर्वांत मोठे मार्गदर्शक ठरतात. समाजातील व्यवहार आणि मानवी मूल्ये यांचा आपल्या व्यावहारिक जीवनात ताळमेळ साधण्यासाठी श्रीरामाकडे देव म्हणून नव्हे तर माणूस म्हणून बघायला, त्यादृष्टीने त्यांचे चरित्र वाचायला शिकले पाहिजे.

कर्तव्यदक्षता आणि नातेसंबंध : श्रीरामाचे आपल्या पत्नीबद्दलचे, सीतेबद्दलचे प्रेम हे केवळ भावनिक नव्हते, तर ते स्त्री सन्मान आणि आदर यावर आधारलेले होते. आजच्या केवळ शारीरिक आकर्षणाच्या आणि भौतिक सुखाच्या पाठीमागे धावण्याच्या काळात जिथे नाती ठिसूळ होत आहेत, तिथे रामाचे एकपत्नीव्रत आणि सीतेची कठीण प्रसंगातही पत्नी म्हणून पतीला साथ देण्याची वृत्ती प्रेरणादायी आहे. पण असा राम आणि अशी सीता आपल्या युवा पिढीच्या मनात लहानपणापासून रुजविण्याचे काम आपण केले आहे का? आणि आजही करतो आहोत का ?

शक्ती, बुद्धी, युद्ध कौशल्य, पराक्रम या सर्व बाबींमध्ये सर्वश्रेष्ठ असलेला राम कैकेयीच्या सावत्रभावाने झालेल्या अन्यायाने पेटून उठत नाही. उलट यामुळे आपल्या पित्यावर ओढवलेल्या धर्मसंकटात त्यांना धीर देत, निर्माण झालेली परिस्थिती स्वीकारून वनवासाला जाण्याची तयारी करते.



त्याचप्रमाणे श्रीरामाच्या पादुका ठेवून राज्य करणारा भरत हे बंधुप्रेमाचे अत्युच्च शिखर आहे. १४ वर्षांचा वनवास संपवून राम जेव्हा अयोध्येला परत येतात तेव्हा आपल्या खांद्यावरचे मानवस्त्र जमिनीवर पसरवून रामचरणांसाठी पायघड्या घालणारा भरत रामाइतकाच महत्त्वाचा. पण भावाकडून अशी अपेक्षा करतानाच त्यासाठी आधी रामासारखी संतुलित, संयमित वृत्ती आपल्या मनात असायला हवी.

लोकसंग्रह आणि नेतृत्व : श्रीरामांनी अयोध्येच्या गादीवर बसून सत्ता गाजवली नाही तरीही बालपणी आणि किशोरावस्थेत अयोध्या नगरवासीयांच्या सोबतच्या त्यांच्या व्यवहाराने नगरवासीयांच्या मनात रामाप्रति आत्मीयतेची भावना निर्माण झाली होती. राम वनवासाला निघाले असताना त्यांच्या मागोमाग नगराच्या वेशीपर्यंत धावत जाणारे प्रजाजन हे त्या आत्मीयभावाचे दर्शन आहे. आज लोकनेत्याच्या मनात जनसामान्यांविषयी संवेदनशीलता आणि जनमानसात नेत्यांप्रति अशी आत्मीयता असावी असे वाटत असेल तर दोघांच्याही मनात राम असायलाच हवा ना !

मर्यादित साधनांतून उद्दिष्ट साध्य करण्याचे कौशल्य : आजच्या कॉर्पोरेट जगात आपण लीडरशिप आणि टीम मॅनेजमेंट शिकतो, पण रामाचे चरित्र हे याचा चालता-बोलता वस्तुपाठ आहे. राजमहालातून निघून वनवास स्वीकारणे म्हणजे खरे तर अडचणींचा डोंगरच समोर उभा होता. पण त्या वनवासातील काळात जागोजागी वनात वसलेल्या वनवासींना आपल्या आत्मीय व्यवहाराने आपल्यासोबत जोडून घेण्यासाठी त्याचा उपयोग करण्याचे आणि वनवासाला आपत्ती न समजता त्याचीच इष्टापत्ती करण्याचे व्यवहारचातुर्य रामांनी दाखविले. रामाचे संघटनकौशल्य, युद्धचातुर्य आणि नेतृत्वगुण तेव्हा दिसतात जेव्हा ते कोणत्याही मोठ्या सैन्याशिवाय, केवळ वनवासी आणि वानर टोळीच्या मदतीने बलाढ्य रावणाचा पराभव करतात. आजच्या भाषेत सांगायचे तर, मर्यादित संसाधनांचा प्रभावी वापर करून अशक्य ध्येय गाठणे हे रामाकडून शिकण्यासारखे आहे. सोशल मीडिया आणि आपली वैचारिक पातळी : सोशल मीडियावर आज अनेक विषयांच्या संदर्भात पोस्ट आणि प्रतिक्रियांचा पाऊस पडत असतो. जेवढी मने तेवढी मतमतांतरे तर असतातच. काही कायम असंतुष्ट लोकांच्या पोस्ट्स तर संताप आणणाऱ्या असतात. पण त्यावर व्यक्त होतानाही आजकाल बरेचदा आक्रस्ताळेपणा, अकांडतांडव बघायला मिळतो. त्या प्रतिक्रियांचा, भाषेचा स्तरही तितकाच खालावलेला असतो.

जगातील आनंदी देशांच्या क्रमवारीत आज भारत ११६ व्या क्रमांकावर आहे असे नुकतेच जाहीर झाले आहे. (ही तुलना करण्याचे आणि हे ठरविण्याचे त्यांचे मापदंड कितपत योग्य आहेत हा भाग वेगळा) पण आपण मागे का पडतो?

याचे एक मुख्य कारण म्हणजे, आपली रामकृपेवरची श्रद्धा, प्राप्त परिस्थितीत संतुष्ट राहण्याची वृत्ती, ती इष्टापत्तीच आहे असा मनात असलेला विश्वास डळमळीत झाला आहे. मग मंदिरात राम आला असला तरी आपल्या मनात राम राहिला नाही काय? असा प्रश्न सहजच मनात येतो.

मंदिरे : केवळ वास्तू नव्हे, तर ऊर्जा केंद्रे : आज आपण भव्य मंदिरे उभारत आहोत, पण ही मंदिरे केवळ गाभाऱ्यातील मूर्तींच्या दर्शनापुरती मर्यादित न राहता ती ऊर्जा केंद्रे व्हायला हवीत. तिथून सामाजिक समरसता, शिस्त आणि चारित्र्यनिर्मितीचा राम विचार मनामनात प्रसवला पाहिजे. जेव्हा समाज रामाच्या गुणांचे अनुकरण करतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने मंदिराचे उद्दिष्ट साध्य होते.

''रामजन्मभूमीतील भव्य मंदिरात श्रीरामांची प्राण प्रतिष्ठापना झाली आता समाजात प्रत्येक मनमंदिरात रामाची प्रतिष्ठापना व्हायला हवी.'' २२ जानेवारी २०२४ ला राम जन्मभूमी अयोध्या येथे श्रीरामांच्या बालमूर्तीची प्राण प्रतिष्ठापना झाली त्यावेळी बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केलेले हे वक्तव्य आहे.

जेव्हा आपल्या मनात राम प्रतिष्ठापित होईल, तो नेहमी जागा राहील, आपल्या विचारांत आणि कृतीत उतरेल तेव्हाच समाजात संयम, नीतिमत्ता आणि आनंद नांदेल. या मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाची तुमच्या, माझ्या, सर्वांच्या मनामनात प्रतिष्ठापना व्हावी हीच या रामनवमी उत्सव निमित्ताने श्रीराम चरणी प्रार्थना! ▮▮

९८२२५६९६४८

वेध

नंदकिशोर काथवटे

भोंदूगिरीचा विकृत चेहरा

महाराष्ट्रात गेल्या १३ वर्षांत भोंदूगिरीचे तब्बल २ हजार गुन्हे नोंदले गेले- ही केवळ आकडेवारी नाही, तर समाजाच्या विवेकबुद्धीवर उठलेला गंभीर प्रश्न आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर ते छत्रपती संभाजीनगर अशा अनेक जिल्ह्यांत हे गुन्हे सातत्याने समोर येत आहेत. म्हणजेच हा प्रश्न एखाद्या गावापुरता किंवा दुर्गम भागापुरता मर्यादित नाही, तर शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत अंधश्रद्धेची पकड तितकीच मजबूत आहे.

या प्रकरणांमधील सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे महिलांचे होणारे शोषण. अनेक प्रकरणांत देवदर्शन, उपचार, वाईट शक्ती काढणे अशा नावाखाली महिलांवर अत्याचार झाले, त्यांचे मानसिक आणि शारीरिक शोषण झाले. भीती, लाज आणि सामाजिक दबावामुळे अनेक महिला तक्रार करण्यासही पुढे येत नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांची संख्या ही नोंद झालेल्या गुन्ह्यांपेक्षा कितीतरी पटीने अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सरकारने अंधश्रद्धा विरोधी कायदा केला, त्यात सुधारणा केल्या, समित्या नेमल्या. पण या कायद्याची अंमलबजावणी अजूनही अपेक्षित पातळीवर दिसत नाही. अनेक वेळा पोलिस यंत्रणा तक्रार आल्याशिवाय हालचाल करत नाही. आणि जेव्हा तक्रार येते, तेव्हा तोपर्यंत मोठी फसवणूक किंवा अत्याचार घडून गेलेला असतो. कायद्याचा धाक निर्माण होण्याऐवजी, भोंदू बाबांची निर्भयता वाढत चालली आहे. पण या सगळ्यात केवळ भोंदू बाबांना दोष देऊन आपण मोकळे होऊ शकत नाही. कारण त्यांची दुकाने चालतात ती आपल्या विश्वासावर. आपणच त्यांच्या पायाशी नतमस्तक होतो, त्यांच्या प्रत्येक शब्दाला सत्य मानतो आणि आपल्या समस्या सोडवण्यासाठी विवेक बाजूला ठेवतो.

आजही अनेक लोक आजारांवर वैद्यकीय उपचाराऐवजी भोंदू बाबांकडे जातात. आर्थिक संकट, कौटुंबिक कलह किंवा वैयक्तिक अडचणी यावर झटपट उपाय मिळेल या आशेने लोक लाखो रुपये खर्च करतात. हा पैसा, हा विश्वास- सगळे काही एका भ्रमावर उभे असते. आणि जेव्हा हा भ्रम तुटतो, तेव्हा हातात उरते ती केवळ फसवणूक. श्रद्धा असावी, पण अंधश्रद्धा नसावी, ही साधी गोष्ट आपण विसरत चाललो आहोत. श्रद्धा माणसाला उभारी देते, पण अंधश्रद्धा त्याला गुलाम बनवते. आज समाजात श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धा वाढवली जात आहे. काही भोंदू बाबा तर थेट ईश्वरालाच आव्हान देत आहेत, मीच सर्वकाही करू शकतो असा दावा करत आहेत. आणि दुर्दैव म्हणजे, लोक त्यावर विश्वास ठेवत आहेत. महिलांच्या शोषणाच्या घटना, वेगवेगळ्या जिल्ह्यांतील गुन्ह्यांची वाढती संख्या आणि प्रशासनाची संथ भूमिका, या सगळ्यामुळे एक गोष्ट स्पष्ट होते की, हा प्रश्न केवळ कायद्याने सुटणार नाही. यासाठी समाजमन बदलणे अत्यावश्यक आहे. शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रश्न विचारण्याची सवय हेच अंधश्रद्धेवरचे खरे औषध आहे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःला विचारायला हवे की, आपण खरोखरच विवेकाने जगतोय का? की अजूनही भीती आणि अज्ञानाच्या आधारे निर्णय घेतोय? २ हजार गुन्ह्यांची ही आकडेवारी केवळ भूतकाळ नाही, ती एक इशारा आहे. जर आपण अजूनही जागे झालो नाही, तर उद्या ही संख्या आणखी वाढेल. आणि त्यासाठी दोष फक्त भोंदू बाबांचा नसेल, तर आपल्या अंधविश्वासाचाही असेल.

वेळ आली आहे डोळे उघडण्याची, आवाज उठवण्याची आणि अंधश्रद्धेच्या या साखळ्या तोडण्याची. नाहीतर चमत्कार या नावाखाली आपलीच फसवणूक होत राहील आणि आपण त्याला नियती समजत राहू. या परिस्थितीकडे केवळ सामाजिक प्रश्न म्हणून न पाहता, ती एक गंभीर मानसिकता बनत चालली आहे हेही लक्षात घ्यावे लागेल. अंधश्रद्धेच्या या विळख्यात अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. काही ठिकाणी घरातील सर्व निर्णय हे भोंदू बाबांच्या सांगण्यावर घेतले जातात. इग्न, शिक्षण, व्यवसाय, आजारपण यासारख्या महत्त्वाच्या गोष्टींचाही निर्णय विवेकाऐवजी अंधविश्वासावर आधारित घेतला जातो. परिणामी, चुकीचे निर्णय, आर्थिक नुकसान आणि मानसिक ताण यांचे दुष्परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात. ही केवळ व्यक्तीची चूक नसून, समाजातील चुकीच्या विचारसरणीची साखळी आहे जी एकामागून एक लोकांना अंधाराकडे ढकलत आहे. म्हणूनच आज गरज आहे ती सामूहिक जबाबदारीची. पालकांनी मुलांना लहानपणापासून वैज्ञानिक दृष्टिकोन देणे, शाळांनी विवेकवादी विचार शिकवणे आणि समाजातील जागरूक घटकांनी अशा प्रकारांविरोधात उघडपणे आवाज उठवणे आवश्यक आहे. माध्यमांनीही फक्त घटना मांडण्यापलीकडे जाऊन जनजागृतीची भूमिका पार पाडली पाहिजे. प्रत्येकाने ठरवले की मी अंधश्रद्धेला बळी पडणार नाही, तरच हा बदल शक्य आहे. कारण भोंदूगिरी थांबवण्याची खरी ताकद कायद्यापेक्षा समाजाच्या जागृतीत आहे आणि ती जागृती आता प्रत्येकाच्या मनात पेटण्याची वेळ आली आहे. ▮▮

९९२२९९९५८८

दिल्ली वार्तापत्र


श्यामकांत जहागीरदार

नरेंद्र मोदी यांचा असाही विक्रम

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदावर विराजमान झाल्यापासून अनेक विक्रम केलेत. देशातील सर्वाधिक लोकप्रिय पंतप्रधान म्हणून मोदी ओळखले जातात. एकेकाळी क्रिकेटमध्ये सुनील गावस्कर आणि नंतर सचिन तेंडुलकर यांनी जेवढे विक्रम केलेत, तेवढे विक्रम मोदी यांनी राजकारणात आधी मुख्यमंत्री आणि नंतर पंतप्रधान म्हणून केलेत. २२ मार्चला मोदी यांनी सरकारप्रमुख म्हणून काम करण्याचा सिक्कीमचे तत्कालीन मुख्यमंत्री पवनकुमार चामलिंग यांचा ८९३० दिवसांचा विक्रम मोडत ८९३१ व्या दिवसामध्ये प्रवेश केला. चामलिंग यांनी ८९३० दिवस सिक्कीमचे मुख्यमंत्रिपद भूषवले, देशात सर्वाधिक काळ सरकारप्रमुख म्हणजे मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा विक्रम चामलिंग यांच्या नावावर आहे. तो विक्रम आता कोणी मोडू शकेल, असे वाटत नाही.

गुजरातचे मुख्यमंत्री आणि देशाचे पंतप्रधान म्हणून मोदी यांनी ८९३१ दिवस काम करत सरकारप्रमुख म्हणून ८९३० दिवस काम करण्याचा सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री चामलिंग यांचा विक्रम मोडला आहे. हा विक्रम मोडण्यासाठी मोदी यांना मुख्यमंत्री आणि पंतप्रधान अशा दोन्ही पदांवर काम करावे लागले. चामलिंग यांनी मुख्यमंत्री म्हणून एवढा प्रदीर्घ काळ काम करत देशात इतिहास घडवला. मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून १४ वर्ष काम केले. ७ ऑक्टोबर २००१ ला मोदी यांनी पहिल्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर त्यांच्या नेतृत्वात भाजपाने गुजरात विधानसभेच्या सलग तीन निवडणुका बहुमताने जिंकल्या. सर्वाधिक काळ गुजरातचे मुख्यमंत्रिपद भूषवण्याचा विक्रम मोदी यांच्या नावावर आहे.

२०१४ मध्ये मोदी यांनी पहिल्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. गुजरातप्रमाणेच सलग तीन लोकसभा निवडणुका मोदी यांनी भाजपाला जिंकून दिल्या. मोदी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, तेव्हा ते गुजरातच्या मंत्रिमंडळात मंत्री तर सोडा पण गुजरात विधानसभेचे साधे आमदारही नव्हते. ते थेट मुख्यमंत्री झाले. असाच विक्रम मोदी यांनी देशाचे पंतप्रधान म्हणूनही केला. पंतप्रधान होण्याआधी मोदी केंद्रीय मंत्रिमंडळात कधीच नव्हते, एवढेच काय ते लोकसभा वा राज्यसभेचे खासदारही नव्हते. मोदी जसे थेट गुजरातचे मुख्यमंत्री झाले, तसेच थेट देशाचे पंतप्रधानही झाले. येत्या मे महिन्यात मोदी यांच्या पंतप्रधानपदाला १२ वर्ष पूर्ण होतील. तर मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्यांची २६ वर्षांची कारकीर्द पूर्ण होईल. मुख्यमंत्री म्हणून प्रदीर्घ अनुभव असलेले मोदी देशातील एकमेव पंतप्रधान आहेत.



देशाचे पंतप्रधानपद सर्वाधिक काळ भूषवण्याचा दुसऱ्या क्रमांकाचा विक्रम मोदी यांच्या नावावर आहे. आतापर्यंत हा विक्रम इंदिरा गांधी यांच्या नावावर होता. ४०७७ दिवस इंदिरा गांधी यांनी देशाचे पंतप्रधानपद भूषवले. मोदी यांच्या पंतप्रधानपदाचे ४३१८ दिवस पूर्ण झाले आहेत, म्हणजे मोदी यांनी या पदावर सर्वाधिक काळ राहण्याचा इंदिरा गांधी यांचा दुसऱ्या क्रमांकाचा विक्रम मोडला. इंदिरा गांधी यांना सलग तीनदा पंतप्रधानपदाची शपथ घेता आली नव्हती. मोदी यांनी सलग तीनवेळा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे.

देशाचे पंतप्रधानपद सर्वाधिक काळ भूषवण्याचा विक्रम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नावावर आहे. नेहरू ६१२६ दिवस देशाचे पंतप्रधान होते. पण सरकारप्रमुख म्हणून प्रदीर्घ काळ काम करत मोदी यांनी नेहरू यांनाही मागे टाकले आहे. डॉ. मनमोहनसिंग यांनी ३६५६दिवस देशाचे पंतप्रधानपद सांभाळले. अटलबिहारी वाजपेयी २२५६ दिवस देशाचे पंतप्रधान होते. राजीव गांधी फक्त १८५७ दिवस पंतप्रधानपदावर राहिले. देशात असे अनेक पंतप्रधान होऊन गेले, ज्यांना वर्षभरही पंतप्रधानपद सांभाळता आले नाही. काही पंतप्रधान तर संसदेचे तोंडही पाहू शकले नाहीत.

मुख्यमंत्रिपद आणि पंतप्रधानपद सर्वाधिक काळ सांभाळण्याचा विक्रमही मोदी यांच्या नावावर आहे. आतापर्यंत फार कमी असे नेते झाले, ज्यांनी मुख्यमंत्रिपद आणि पंतप्रधानपद अशी दोन्ही पदे सांभाळली. पण दीर्घकाळ ही दोन्ही पदे सांभाळण्याचा विक्रम फक्त मोदी यांच्या नावावरच आहे. तो आता कोणाला आणि कधीच मोडता येईल, असे वाटत नाही. क्रिकेटमधील विक्रम हे मोडण्यासाठीच असतात, त्यामुळे सुनील गावस्कर आणि सचिन तेंडुलकर यांनी केलेले विक्रम नंतरच्या अनेक क्रिकेटपटूंनी मोडले. पण मोदी यांनी राजकारणात केलेले विक्रम कोणी मोडू शकेल, असे वाटत नाही.

चामलिंग यांच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर ओडिशाचे तत्कालीन मुख्यमंत्री नवीन पटनायक आहेत. पटनायक ८८६५ दिवस ओंडिशाचे मुख्यमंत्री होते. ज्योती बसू मुख्यमंत्रिपद सांभाळण्याच्या बाबतीत देशात तिसऱ्या क्रमांकावर आहेत. बसू यांनी ८५३८ दिवस पश्चिम बंगालचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री गेगांग अपांग हे यादीत चौथ्या क्रमांकावर आहे. ते ८२८६ दिवस अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री होते. मिझोरामचे मुख्यमंत्री लालथनवाला हे यादीत पाचव्या क्रमांकावर आहेत. ८०९६ दिवस त्यांनी मिझोरामचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. हिमाचल प्रदेशचे वीरभद्रसिंह हे यादीत सहाव्या स्थानावर आहे. वीरभद्रसिंह यांनी ७६८३ दिवस हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. माणिक सरकार ७३०३ दिवस त्रिपुराचे मुख्यमंत्री होते. नितीशकुमार यांनी ७१५४ दिवस बिहारचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. देशात सर्वाधिक म्हणजे दहावेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रम नितीशकुमार यांच्या नावावर आहे, जो अजूनपर्यंत कोणालाच मोडता आला नाही. नागालॅण्डचे नेफ्यू रियो या यादीत दहाव्या क्रमाकांवर आहे, त्यांनी ६९६५ दिवस नागालॅण्डचे मुख्यमंत्रिपद सांभाळले.

गंमत म्हणजे देशात सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपद भूषवणाऱ्या या यादीत काँग्रेस आणि भाजपाचा प्रत्येकी एक मुख्यमंत्री आहे. भाजपाचे नरेंद्र मोदी आणि काँग्रेसचे वीरभद्रसिंह हे ते भाग्यवान नेते आहेत. ईशान्य भारतातील पाच राज्यांतील मुख्यमंत्र्यांना हे भाग्य लाभले आहे. प्रादेशिक पक्षात बिजू जनता दलाचे नवीन पटनायक आणि जनता दल संयुक्तचे नितीशकुमार हे या मालिकेतील अन्य भाग्यवान नेते आहेत. या दहा नेत्यांच्या यादीत नवीन पटनायक हे एकमेव असे नेते आहेत, ज्यांचे वडील बिजू पटनायकही ओडिशाचे मुख्यमंत्री होते. या यादीत अन्य कोणताही असा नेता नाही, एकतर ज्याचे वडील मुख्यमंत्री होते वा ज्यांचा मुलगाही नंतर मुख्यमंत्री झाला. मोदी वगळता या यादीतील कोणताही नेता देशाचा पंतप्रधान होऊ शकला नाही. नाही म्हणायला एकदा ज्

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

परंडा पोलीस ठाण्यात गोंधळ; पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२६ मार्च -

परंडा पोलीस ठाण्याच्या आवारात शासकीय कामकाज सुरू असताना गोंधळ घालून पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की, दि.२५ मार्च रोजी दुपारी सुमारे २.४५ वाजण्याच्या सुमारास परंडा पोलीस ठाणे आवारात फिर्यादी शिवाजी बबन राउत (वय ३९), नियुक्ती पोलीस ठाणे परंडा, हे आपल्या सहकाऱ्यांसह शासकीय कामकाज करत होते.

यावेळी आरोपी अभिमान दिगंबर काळे, फुलाबाई अभिमान काळे, अनिषा अभिमान काळे व दिलीप अभिमान काळे (सर्व रा. देवगाव, ता.परंडा, जि.धाराशिव) यांनी तेथे येऊन शिवीगाळ केली. तसेच तुझी वर्दी काढून टाकतो अशी धमकी देत मोठ्याने आरडाओरडा करून सार्वजनिक शांततेचा भंग केला.

याचदरम्यान आरोपींपैकी एका व्यक्तीने पोलीस कर्मचाऱ्याच्या हाताच्या बोटाला चावा घेऊन जखमी केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. प्रकरणी फिर्यादी शिवाजी राउत यांनी दिलेल्या तक्रारीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

संक्षिप्त वृत्त...



धाराशिवमध्ये नारी शक्ती सन्मान सोहळा संपन्न

धाराशिव, दि.२६ मार्च -

धाराशिव नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील प्रमुख उपस्थित होत्या. समाजाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या व आपल्या कर्तृत्व, जिद्द आणि समर्पणातून आदर्श निर्माण करणाऱ्या महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. महिला सक्षमीकरणाला चालना देणारा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास नगराध्यक्षा नेहा काकडे, महिला व बालकल्याण सभापती वैशाली सोनवणे, नगरसेविका व महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



जवळका येथे 'पंचायत समिती आपल्या दारी' उपक्रम संपन्न

वाशी, दि.२६ मार्च -

वाशी तालुक्यातील जवळका येथे माजी मंत्री व आमदार तानाजीराव सावंत यांच्या संकल्पनेतून 'पंचायत समिती आपल्या दारी' हा उपक्रम २५ मार्च रोजी उत्साहात पार पडला. कार्यक्रमास सभापती प्रणिता गायकवाड, उपसभापती नितिन रणदिवे तसेच गटविकास अधिकारी ओंकार गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विभागप्रमुखांनी शासनाच्या योजनांची सविस्तर माहिती देत नागरिकांच्या शंकांचे निरसन केले. आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य तपासणीही करण्यात आली. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायतीच्या प्रशासक निकिता नाळपे तसेच नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन विकास नाळपे यांनी केले, तर आभार निलेश आडमुटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



लोहाऱ्यात ज्ञान संस्कार क्लासेसच्या विद्यार्थ्यांचा नवोदय यशाचा गौरव

लोहारा, दि.२६ मार्च -

लोहारा शहरातील 'ज्ञान संस्कार' कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी पहिल्याच वर्षी नवोदय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. यानिमित्त २५ मार्च रोजी तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. पहिल्याच बॅचमधील १३ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थी नवोदय पात्र ठरले, तर ७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अर्जिक्य भोंडवे व हर्षद ढोबळे यांचा समावेश आहे. यावेळी तहसीलदार कोळेकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी योग्य मार्गदर्शन व मेहनतीचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास विक्रांत संगशेट्टी, ओम कोरे, विश्वास ढोबळे, व्यंकटेश पोतदार आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन वैष्णवी गर्जे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. गणेश गुंड यांनी मानले.

जय श्रीराम! : धाराशिव नगरीत रामनवमीचा भगवामय जल्लोष







तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ मार्च -

श्री रामनवमीच्या पावन पर्वानिमित्त धाराशिव नगरीत आज अभूतपूर्व उत्साह, भक्तीभाव आणि एकतेचे दर्शन घडले. प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन केले आणि रॅलीचा शुभारंभ केला. रॅलीदरम्यान जय श्रीराम! च्या जयघोषाने संपूर्ण धाराशिव नगरी दुमदुमून गेली. हातात भगवे ध्वज, अंगावर केशरी फेटे, पारंपरिक वेशभूषा आणि चेहऱ्यावर उत्साह- असे भक्तिमय चित्र सर्वत्र पाहायला मिळाले. ढोल-ताशांचा गजर, लेझीम पथके आणि भजन मंडळांच्या सादरीकरणामुळे वातावरण अधिकच रंगतदार झाले.



या रॅलीत लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. विशेषतः तरुणाईचा जोश आणि महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग हे या सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले. अनेकांनी भगवे ध्वज, बॅनर आणि फलक हातात घेत श्रीराम ांच्या जयघोषात सहभाग घेतला. या भव्य रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. वाहतूक नियंत्रण, सुरक्षा व्यवस्था आणि वैद्यकीय सुविधा यांची योग्य काळजी घेण्यात आली होती.

रामनवमीच्या या सोहळ्याने धाराशिव नगरीत धार्मिक श्रद्धेबरोबरच सामाजिक एकतेचा आणि सांस्कृतिक अभिमानाचा संदेश दिला. विविध समाजघटकांनी एकत्र येऊन साजरा करण्यात आला. जय श्रीराम! च्या गजरात साजऱ्या झालेल्या या उत्सवाने धाराशिवकरांच्या मनात भक्ती, उत्साह आणि अभिमानाची नवी ऊर्जा निर्माण केली.

धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल...

रामनवमीच्या निमित्ताने शहरातील विविध मंदिरांमध्ये सकाळपासूनच अभिषेक, पूजन, रामरक्षा पठण, कीर्तन आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. अनेक ठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. काही मंडळांनी रामजन्म सोहळ्याचे देखावे साकारून भक्तांना रामायणातील प्रसंगांचे दर्शन घडवले.

श्रीराम नवमीच्या निमित्ताने परंडा नगरीत भगवामय जल्लोष!

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२६ मार्च -

रामनवमीच्या पवित्र, मंगलमय पर्वानिमित्त संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात भक्तिमय वातावरणात भव्य भगवा ध्वज यात्रांचे आयोजन करण्यात आले.

सत्य, धर्म आणि आदर्श जीवनाचे प्रतीक असलेल्या प्रभू श्रीरामांच्या चरणी नतमस्तक होत, आपल्या समृद्ध संस्कृतीची आणि परंपरेची जपणूक करत हजारो भाविक भगव्या ध्वजाखाली एकत्र आले.

परंडा शहरातही या पावन दिनाचे औचित्य साधत भगवा ध्वज यात्रेचे आयोजन करण्यात आले. महाराणा प्रताप चौकातून सुरू झालेली ही दिमाखदार रॅली जय श्रीराम च्या जयघोषात संपूर्ण शहर दुमदुमवत राम मंदिरापर्यंत पोहोचली. प्रत्येकाच्या हातात भगवा ध्वज आणि मनात प्रभू रामांविषयीची अखंड श्रद्धा- असे अद्भुत दृश्य अनुभवायला मिळाले.

या भव्य यात्रेत मा.आ. सुजितसिंह ठाकूर, युवा नेते मल्हार पाटील, जि.प. सदस्य धनंजय सावंत यांच्यासह परंडा शहरातील मान्यवर तसेच हजारो हिंदू बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



३.२२ लाखांचा दंड वसूल

धाराशिव, दि.२६ मार्च -

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने २५ मार्च रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर एकूण ३२८ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईतून ३ लाख २२ हजार ७५० रुपयांचा तडजोड दंड वसूल करण्यात आला.

दुचाकी अपघातात एकाचा मृत्यु

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ मार्च -

नळदुर्ग-अक्कलकोट मार्गावरील गुळहळी शिवारात झालेल्या दुचाकी अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शांतकुमार राम सुतार (वय ४९, रा. चुंगी, ता. अक्कलकोट) हे पत्नी शरयु सुतार यांच्यासह १३ मार्च रोजी सकाळी मोटरसायकलवरून जात असताना समोरून आलेल्या दुचाकीने धडक दिली.

या अपघातात शांतकुमार सुतार गंभीर जखमी होऊन मृत्यूमुखी पडले, तर संजय बाबुराव लांडगे गंभीर जखमी झाले.

लोहारा : महात्मा फुले जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.२६ मार्च -

लोहारा शहरात महात्मा फुले युवा मंचच्या वतीने महात्मा फुले जयंती उत्सवानिमित्त बैठक घेऊन उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक अविनाश माळी होते.



या बैठकीत समितीच्या अध्यक्षपदी किशोर माळी, उपाध्यक्षपदी अशोक काटे व गणेश माळी, सचिवपदी प्रशांत क्षीरसागर, सहसचिवपदी विष्णु क्षीरसागर, तर सजावट प्रमुखपदी अभिजीत क्षीरसागर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. बैठकीस श्रीनिवास माळी, राजेंद्र माळी, शरण फुलसुंदर, सचिन माळी, दिनेश माळी यांच्यासह अनेक पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

काटी येथे घरफोडी; रोख रक्कम व दागिन्यांसह ६० हजारांचा मुद्देमाल लंपास

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ मार्च -

तुळजापूर तालुक्यातील काटी येथील एका घरफोडीच्या घटनेत अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा सुमारे ६० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत फिर्यादी दशरथ अनंता मदणे (वय ३२, रा. काटी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी तामलवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी घरातील रोख रक्कम ४०,००० रुपये व सुमारे अर्ध्या तोळ्याचे सोन्याचे दागिने असा एकूण अंदाजे ६०,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला.

या प्रकरणी फिर्यादीने दि.२५ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस करत आहेत.

पल्लवी तांबारेची लोहमार्ग पोलीसपदी निवड; गावाकडून गौरव

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२६ मार्च -

आंदोरा येथील पल्लवी तांबारे हिने अल्पवयात मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर छत्रपती संभाजीनगर येथे लोहमार्ग पोलीस पदासाठी निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या पल्लवीने लहानपणापासूनच अभ्यासात हुशारी दाखवली.

तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आंदोरा येथे, तर उच्च शिक्षण मोहेकर कॉलेज, कळंब येथे पूर्ण झाले. ती एनसीसीचे 'उ' प्रमाणपत्रही उत्तीर्ण आहे.

भरती परीक्षांमध्ये अपयश आले तरी न खचता सातत्याने प्रयत्न करत राहिल्यामुळेच तिला हे यश मिळाले. वयाच्या अवघ्या २२व्या वर्षी मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

पल्लवीच्या या यशाबद्दल आंदोरा गावातील वरिष्ठ नागरिकांनी प्राथमिक शाळा, हायस्कूल तसेच गावात सत्कार समारंभ आयोजित करून तिचा गौरव केला. तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सोलापुरात 'महिला महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेचा थरार

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ मार्च -

सह-प्रायोजक सेरेंटिका रिन्युएबल्स आणि आयोजक निरझरा केअर फाउंडेशनच्या यांच्या वतीने कै. सिद्धराम साखरे यांच्या स्मरणार्थ तसेच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ४ थी 'महिला महाराष्ट्र केसरी' तसेच वरिष्ठ गट महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा - २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच खुल्या गटातील पुरुष कुस्ती स्पर्धांचाही समावेश करण्यात आला असून राज्यभरातील नामांकित महिला व पुरुष पैलवानांचा सहभाग अपेक्षित आहे.

ही स्पर्धा २८ ते २९ मार्च २०२६ दरम्यान सायंकाळी ५ ते ९ या वेळेत सोलापूर येथील हरिभाई देवकरण प्रशाला, होम मैदान परिसरात पार पडणार आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध कुस्ती परंपरेला उजाळा देणारी ही स्पर्धा ऐतिहासिक ठरणार असून महिला शक्तीचा भव्य संग्राम पाहायला मिळणार आहे.

हरितऊर्जा निर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी सेरेंटिका रिन्यूएबल्स ही या स्पर्धेची सह-प्रायोजक असून महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहे. नुकतेच महिला दिनानिमित्त धाराशिव जिल्ह्यातील २० महिलांना शिलाई प्रशिक्षण देऊन त्यांना शिलाई मशिनचे वितरण करण्यात आले.



कार्यक्रमाचे उद्घाटन ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार असून, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर तसेच आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच रामदास तडस, मुरलीधर मोहोळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये राज्यसभा खा.डॉ. ज्योती वाघमारे, आमदार देवेंद्र कोठे, विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, समाधान आवताडे, दिलीपराव सोपल, नारायण पाटील, उत्तमराव जानकर तसेच महापौर विनायक कोंड्याल यांचा समावेश आहे. 'महिला महाराष्ट्र केसरी' विजेत्यास 'किया सोनेट' कार, तर उपविजेत्यास 'बुलेट' बाईक देण्यात येणार आहे. याशिवाय विविध वजन गटांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

पुरुष गटातील स्पर्धांमध्येही विविध वजन गटांनुसार ४,००० ते ३०,००० रुपयांपर्यंत बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. 'वजनाची अट असून वयाची अट नाही' या निकषावर ही स्पर्धा खेळविण्यात येणार आहे.

श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे हजारो भाविकांच्या उपस्थितीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहात



तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२६ मार्च -

प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे दि. २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी तुळजापूर तालुक्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी रामतीर्थ येथे भेट देऊन श्रीरामांचे दर्शन घेतले.

सालाबादाप्रमाणे यंदाही श्रीक्षेत्र रामतीर्थ देवस्थानच्या वतीने महंत श्री विष्णु प्रसाद शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा आयोजित करण्यात आला. प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन मानल्या जाणाऱ्या या तीर्थक्षेत्रावर दर्शनासाठी भाविकांची नेहमीच मोठी गर्दी असते. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सकाळी ११ वाजता महाआभिषेक व शृंगार करण्यात आला. दुपारी १२ वाजता नळदुर्ग शहरातून निघालेली पालखी मिरवणूक तसेच अणदूर येथून काढण्यात आलेली श्रीरामांच्या मूर्तींची मिरवणूक रामतीर्थ येथे दाखल झाली. या सोहळ्यासाठी नळदुर्गसह जळकोट, अणदूर, लोहगाव, नंदगाव, रामतीर्थ, आलियाबाद परिसरातील हजारो भाविकांनी मोठी उपस्थिती लावली. सोहळ्यानिमित्त श्रीराम मंदिर, हनुमान मंदिर व महादेव मंदिर या तिन्ही मंदिरांना आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच रंगीबेरंगी फुलांनी मंदिरांची सजावट करण्यात आली होती.





दुपारी १२ वाजता महंत विष्णु शर्मा महाराज, हैदराबाद येथील बसवराज पाटील महाराज, पुजारी शुक्ला महाराज यांच्या हस्ते हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्यासोबत नगराध्यक्ष बसवराज धरणे तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, भाजपचे दिवंगत कार्यकर्ते कै. राजेश कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने रामतीर्थ येथे भाविकांसाठी शुद्ध व थंडगार पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्लांट उभारण्यात आला असून, त्याचे लोकार्पणही याच सोहळ्यानिमित्त करण्यात आले. या सुविधेमुळे भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

हा सोहळा शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी महंत विष्णु प्रसाद शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व रामभक्तांनी परिश्रम घेतले.

हिंगोलीत रावनवमी निमित्त भव्य शोभायात्रा ठिकठिकाणी रामजन्मोत्सव साजरा





तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ मार्च

प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्मोत्सवाचे निमित्त शहरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही रामनवमीचा सण अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील श्री संकट मोचन हनुमान मंदिर (अंबिका टॉकीज रोड) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

उत्सवाची सुरुवात भट कॉलनी भागातील ऐतिहासिक श्री शंभो महादेव मंदिर येथून करण्यात आली. सकाळी पूजा-अर्चा केल्यानंतर शोभायात्रेला प्रारंभ झाला. या रॅलीमध्ये 'जय श्रीराम'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. ही भव्य रॅली शहरातील जवाहर रोड, गांधी चौक. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गांवर ठिकठिकाणी रॅलीचे स्वागत करण्यात आले. फुलांच्या वर्षावाने आणि रांगोळ्यांनी रॅलीचा मार्ग सुशोभित करण्यात आला होता. यावर्षीच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे महिला आणि बालकांचा असलेला उत्स्फूर्त सहभाग. अनेक लहान मुलांनी प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता माता आणि हनुमानजींची वेशभूषा साकारली होती. पारंपरिक पोशाखात हजारो महिलांनी या रॅलीत सहभाग नोंदवल्यामुळे वातावरणात एक वेगळीच चैतन्यशक्ती पाहायला मिळाली.

रॅलीचा समारोप अंबिका टॉकीज रोडवरील श्री संकट मोचन हनुमान मंदिर येथे करण्यात आला. रॅली मंदिरात पोहोचल्यानंतर प्रभू श्रीरामाची भव्य महाआरती करण्यात आली. यावेळी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यामुळे शहरात सर्वत्र आनंदाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

शहरातील राम गल्लीतील राम मंदिर, मंगळवारा भागातील दत्त मंदिर, राणीसती मंदिरातही राजन्म महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

शहरातील प्राचीन खाकीबाबा मठातही महंत कौशल्यादास महाराज यांच्या उपस्थितीत रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. यावेळी महाआरती आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

औंढा नागनाथ शहरातील राम मंदिरामध्ये राम नवमीनिमित्त राम जन्मोत्सव कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. यावेळी रामकथेचे वाचन निळकंठ सरस्वती विद्याधर देव यांनी केले.बारा वाजता रामजन्म झाल्यानंतर फटाक्याची आतषबाजी करून व ढोल वाजवून राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, राम मंदिरात महाआरती झाली. यावेळी मा. उपसभापती अनिल देशमुख, माजी उपनगराध्यक्ष साहेबराव देशमुख, निळकंठ देव, गणेश पाटील, गणेश देव, तुळजादास भोपी, श्रीपद भोपी, हरिहर भोपी, सचिन देव, बाळाजी सातव, विजय देशमुख यांच्यासह रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.पोलिस निरीक्षक जी एस राहिरे, उपनिरीक्षक दत्ता कानगुले यांच्या पथकाने कडक बंदोबस्त ठेवला होता.

डिजीटल मोबाईल ॲपच्या माध्यमातून होणार जनगणना

जिल्हाधिकारी कार्यालयात तीन दिवशीय प्रशिक्षण




तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ मार्च

मागील १६ वर्षापासून रखडलेल्या २०२७ च्या जनगणनेला सुरुवात होईल मात्र त्यासाठीच अधिकाऱ्यांना तीन दिवसाच्या प्रशिक्षणाला सुरुवात दि २६ मार्च गुरुवार पासून झाली ही जनगणना आता डिजिटल पद्धतीने म्हणजेच मोबाईल ॲप होणार असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी सांगितले.

येथील जिल्हा नियोजन सभागृहात गुरुवारी तीन दिवशीय म्हणजेच २६ ते २८ या कालावधीत सकाळी साडे नऊ ते सायंकाळी पाच यावेळेत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी गृहमंत्रालया सहायक निर्देशक चे प्रशिक्षक सुनील अतराम, संजय नाईक, जी प्रसाद, नायब तहसीलदार माने, आदींची उपस्थिती होती. यावेळी तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी, नगर पालिकेचे मुख्याधिकारी आदींची प्रशिक्षणाला उपस्थिती होती.

पुढे प्रस्तावनेत बोलताना बोधवड म्हणाले, २०२१ मध्ये जनगणना होणार होती. मात्र कोविड संकट आल्याने पुढे ढकलण्यात आली. आता १६ वर्षानंतर म्हणजेच २६-२७ मध्ये पूर्ण केली जाणार आहे. आता पूर्वीच्या पद्धतीला फाटा देत यात जनगनणेत अमूलाग्र बदल करण्यात आला आहे. तंत्रज्ञान, माहिती युग असल्याने आपण प्रशासकीय कामकाजात उपक्रम, योजना राबवता त्याच प्रमाणे आता पोर्टल वर प्रगणकाकडून माहिती भरली जाणार आहे. त्यानुसार जिल्ह्यात काय जबाबदाऱ्या असतील त्या चार्ज ऑफिसर, ऑपरेटर, यांनी येणाऱ्या काळात पूर्ण करतील असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी सांगितले.

हिंगोलीत भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव





तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ मार्च

जैन धर्मीयांचे २४ वे तिर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या २६२४ व्या जन्मकल्याणक निमित्त हिंगोली येथे भव्य म होत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २९ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रख्यात वक्ते डॉ. विवेकजी जैन (छिंदवाडा, म.प्र.) यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान. मैं और मेरे महावीर, भगवान बनने जन्मे हम आणि जिस पंथ चले भगवान वही आचरणीय या विषयांवर ते उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

या दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार २९ मार्च रोजी महाविर भवन येथे दुपारी १२ ते ४ आनंदनगरी (शुद्ध जैन रेसिपी, सायं. ७.०० वा. सांस्कृतिक कार्यक्रम, ८.१५ वा. मैं और मेरे महावीर या विषयावर डॉ. विवेकजी जैन (छिंदवाडा, म.प्र.) यांचे व्याख्यान तसेच दि. ३० मार्च २०२६ सोमवार रोजी सायं. ७.०० वा. सांस्कृतिक कार्यक्रम ८.१५ वा. भगवान बनने जन्मे हम या विषयावर व्याख्यान व दि. ३१ मार्च मंगळवार रोजी सकाळी ८.०० वा. शांतिनाथ दिगंबर जैन मंदिर, आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, रामगल्ली, पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, कासारवाडा, ग्रामीण पोलीस स्टेशन, महावीर किर्ती स्तंभ, संयम किर्ती स्तंभ, गणपती चौक, गांधी चौक, खुराणा पेट्रोल पंप मार्गे महावीर भवन येथे शोभायात्रेचा समारोप होनार असुन त्यानंतर डॉ. विवेकजी जैन यांचे जिस पंथ चले भगवान वही आचरणीय व्याख्यान होनार असुन त्यानंतर दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाला समाज बांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन धर्मलाभ घ्यावा असे आवाहन सकल दिगंबर जैन समाज हिंगोली यांनी केले आहे.



हिंगोली- रेल्वे विभागाच्यावतीने जिजामाता नगर व परिसराला जोडणारा लोखंडी रेल्वे उड्डाण पूलाचे काम सध्या प्रगतीपथावर असून या लोखंडी पूलामुळे नागरिकांची समस्या दूर होणार आहे. छाया- विजय गुंडेकर

संक्षिप्त वृत्त

युवासेना शहराध्यक्षपदी विशाल देशमुख



हिंगोली- राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि युवासेना मुख्य नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेनेच्या संघटनात्मक बांधणीला गती दिली जात आहे. याच पार्श्वभूमीवर, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वश सरनाईक आणि युवासेना मुख्य सचिव किरण साळी, युवा सेना जिल्हा प्रमुख राम कदम यांच्या सूचनेनुसार, हिंगोली विधानसभा शहर अध्यक्षपदी विशाल देशमुख यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. पक्षाचे संघटन मजबुत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रीया विशाल देशमुख यांनी दिली आहे.

आज सुशिक्षित बेरोजगारांसाठी मेळावा

हिंगोली-जिल्ह्यातील सुशिक्षित नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच मॉडेल करिअर सेंटर, हिंगोली यांच्या वतीने शुक्रवार, (दि. २७) रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात पैनगंगा इंटरनेशनल स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कन्हेरगाव नाका, खंडेलवाल ज्वेलर्स, हिंगोली तसेच संकल्प जॉब प्लेसमेंट, हिंगोली या आस्थापनांचा सहभाग राहणार आहे. जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, डी.एड., बी.एड., एम.एड., पदवी व पदवीधर पात्रता असलेल्या नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती व बायोडाटासह शुक्रवार, दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे. या रोजगार मेळाव्याबाबत अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४५६-२२४५७४ किंवा ७३८५९२४५८९ वर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त बा. सु. मरे यांनी केले आहे.

सम्राट अशोक जयंती निमित्त अभिवादन

हिंगोली- महान सम्राट अशोक यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक हॉल येथे दि. २६ मार्च २०२६ गुरूवार अभिवादन करण्यात आले. ज्यांनी तलवारीचा त्याग करून शांतीचा मार्ग निवडला, ज्यांच्या 'अशोक चक्रा'ने आपल्या तिरंग्याला मान मिळवून दिला आणि ज्यांनी भारताचे नाव जगभरात अजरामर केले, अशा महान सम्राट अशोक यांना जयंतीनिमित्त रिपाई जिल्हाध्यक्ष दिवाकर माने यांच्या मार्गदर्शनाखाली अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी प्रसंगी पत्रकार प्रकाश इंगोले, गोविंद जाधव, रवी शिखरे, सुरेश वाठोरे, संतोष पाईकराव, बबन भिसे यांच्या सह बाबासाहेब आंबेडकर समितीच्या पदाधिकाऱ्यांचे मोठ्या संख्येने उपस्थित होती. याप्रसंगी त्रिशरण पंचशील भंते मुदितानंद यांनी दिले.

हिंगोलीत पेट्रोल पंपावर वाहनांची गर्दी



तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ मार्च

शहरात गेल्या काही तासांपासून पेट्रोल आणि डिझेलचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. इंधन संपल्यामुळे शहरातील प्रमुख पेट्रोल पंप बंद पडले असून, सुरू असलेल्या पंपांवर नागरिकांच्या प्रचंड रांगा लागल्या आहेत. यामुळे सर्वसामान्यांमध्ये भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील महत्त्वाचा मानला जाणारा चौधरी पेट्रोल पंप येथील डिझेल आणि पेट्रोलचा साठा पूर्णपणे संपल्यामुळे हा पंप प्रशासनाकडून बंद करण्यात आला आहे. पंप बंद झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच, नागरिकांनी इतर पंपांकडे धाव घेतली. मात्र, तिथेही हीच परिस्थिती असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

सध्या शहरातील खुराणा पेट्रोल पंप, नाईक पेट्रोल पंपावर वाहनांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या लांबच लांब रांगांमुळे वाहतुकीची कोंडी देखील निर्माण होत आहे. नागरिक तासनतास उन्हात उभे राहून इंधन भरण्यासाठी आपली प्रतीक्षा करत आहेत.

नागरिकांची शेवटची आशा असलेल्या पोलीस प्रशासनातर्फे चालवल्या जाणाऱ्या पेट्रोल पंपावरही आता पेट्रोलचा साठा संपत आला आहे. हा साठा मर्यादित असल्याने, काही वेळानंतर हा पंपही बंद होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जर हा पंपही बंद झाला, तर शहरात इंधनाचा मोठा प्रश्न निर्माण होईल.

इंधन संपल्याच्या अफवेमुळे किंवा प्रत्यक्ष तुटवड्यामुळे तसेच लॉकडाऊनची अफवा पसरवली जात असल्यामुळे नागरिकांमध्ये मोठी धावपळ उडाली आहे. कामावर जाणारे कर्मचारी, शेतकरी आणि प्रवासी यांची मोठी गैरसोय होत आहे. पेट्रोल आणि डिझेल मिळवण्यासाठी लोक एका पंपावरून दुसऱ्या पंपावर फेऱ्या मारताना दिसत आहेत. जिल्ह्यात पेट्रोलव डिझेलचा साठा पुरेसा उपलब्ध आहे. नागरिकांनी समाजमाध्यमांवरील अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

पेट्रोलपंपधारकांनी कॅन, बाटल्यात पेट्रोल देऊ नये

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ मार्च

जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा साठा पुरेसा असून नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच पेट्रोलपंप धारकांनी कॅन आणि बाटल्यांमध्ये पेट्रोल किंवा डिझेल देऊ नये असे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

सध्या पेट्रोल आणि डिझेल भरण्यासाठी शहरातील पेट्रोलपंपावर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. समाजमाध्यमांवरील अफवांवर विश्वास ठेवत नागरिक वाहनांमध्ये पेट्रोल डिझेल भरण्यासाठी गर्दी करीत आहेत. यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने नागरिकांना तसेच पेट्रोलपंप धारकांना निर्देश दिले असून नागरिकांनी पॅनीक होऊ नये. तसेच दुचाकी वाहनासाठी जास्तीत जास्त २०० रूपये पर्यंतच इंधर भरण्यात यावे. तीनचाकी व चारचाकी वाहनासाठी जास्तीत जास्त २ हजार रूपये पर्यंतच इंधन भरण्यात यावे. कोणत्याही प्रकारच्या कॅन, बाटल्या अथवा ड्रम आदींमध्ये इंधन देण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. नागरिकांनी अनावश्यक गर्दी व रांगा टाळून आवश्यकतेनुसारच इंधन घ्यावे. रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांना प्राधान्याने इंधन पुरवठा करण्यात यावा. पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा. सर्व पेट्रोलपंप धारकांनी सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा कारवाईचा इशारा पुरवठा अधिकारी आप्पासाहेब पाटील यांनी दिला आहे.

लेफ्टनंट अथर्व घन यांचा सकल ब्राम्हण समाजाच्यावतीने सत्कार



तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ मार्च

येथील अथर्व मुकुंद घन याने अधिकारी प्रशिक्षण पूर्ण करून भारतीय लष्करामध्ये लेफ्टनंट पदावर रुजू होत असल्याबद्दल सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

हिंगोली येथील मुकुंद घन यांचे चिरंजीव अथर्व घन यांनी चेन्नई येथे अतिशय खडतर प्रशिक्षण पूर्ण करून भारतीय लष्करात लेफ्टनंट या पदावर रुजू होत आहेत. ही बाब हिंगोलीकरांसाठी अभिमानाची असून सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने त्यांचा आज शिवाजीनगर येथे सत्कार करण्यात आला. यावेळी अथर्व घन याने लष्करातील अधिकारी पदापर्यंतचा अनुभव सांगितला. त्याचबरोबर आपल्या भागातील तरुणांनी अधिकाधिक परिश्रम करून लष्करात सामील होण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी दत्तराज डोईफोडे, डॉ अगस्ती जवळेकर, डॉ आशुतोष माहुरकर, नंदकुमार आंबेकर, गोपाल महाराज दुबे, संजय घव्हाड, नगरसेवक कपिल खंडेलवाल, केशव दुबे, डॉक्टर संजय नाकाडे, अभय जोशी, कुमार भालेराव, शैलेश नांदेडकर, पत्रकार वसंत कुमार भट, प्रद्युम्न गिरीकर, सुधीर गोगटे, प्रणव पांडे, चंद्रकांत वैद्य, गणेश पहीनकर यांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मोफत गुडघा व नितंब प्रत्यारोपन शस्त्रक्रिया शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद




तभा वृत्तसेवा
हिंगोली, २६ मार्च

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत आयोजित करण्यात आलेले मोफत गुडघा व नितंब प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या संपन्न झाले. ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने तसेच संजीवनी ममता हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने पार पडले.

या शिबिरात एकूण ७० रुग्णांनी सहभाग घेतला असून त्यापैकी २६ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची सखोल तपासणी करून त्यांना आवश्यक त्या उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच गरजू रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनात डॉ. अन्सारी, डॉ. दिपेन शर्मा, आवैज खान, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन भोसले, समाजसेवा अधीक्षक डॉ. संतोष शेंडगे, सोमनाथ वानखेडे व आदिल खान यांचे विशेष योगदान राहिले.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी हे शिबिर अत्यंत लाभदायक ठरले असून नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेबद्दल आयोजकांनी सर्व सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले.







श्रीराम नवमीच्या निमित्ताने नांदेड शहरात शोभायात्रा, रामभक्तांचा उत्साह, पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

भा वृतसेवा
ांदेड, दि. २६ मार्च-

श्रीराम नवमीच्या निमित्ताने नांदेड हरातून आज विविध भागातून भव्य मरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीला त्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी रामभक्तांसाठी चहा,पान, शरबत तसेच फराळांचे वाटप करण्यात आले. रामनवमीच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

श्रीराम नवमीच्या निमित्ताने नांदेड शहरातील विविध भागातून आज शोभायात्रा, मिरवणूका काढण्यात आल्या. सियावर रामचंद्र की जय, जय जय श्रीरामच्या घोषणा देत या मिरवणूका वाजत गाजत शहरातील विविध भागातून काढण्यात आल्या. गाडीपूरा, होळी, जुनामोंढा या भागातून दुपारी निघालेल्या मिरवणुकीत हजारो रामभक्त उत्साहाने सामील झाले होते. यानिमित्त विविध देखावे, भजनी मंडळी यांचाही समावेश होता. आज दुपारी बारा वाजता विविध मंदिरात रामजन्म सोहळा उत्साहात पार पडला. नांदेडच्या यशवंतनगर भागातील राम मंदिरात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. सिडको भागातून देखील भव्य मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी सामाजिक संस्था व विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांनी खिचडी वाटप, शरबत वाटप व पाणी वाटप करुन रामभक्तांची सेवा केली. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरे व विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले होते. रामनवमीच्या निमित्ताने शहरातील सर्वच भागात पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. सर्वच भागात एकच उत्साहाचे वातावरण दिसून आले.

मुदखेड रेल्वे स्थानकावरील पुनर्विकास कामांवर प्रश्नचिन्ह;चौकशीची मागणी

नांदेड -मुदखेड शहरातील महत्त्वाचे असलेल्या मुदखेड रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या पुनर्विकास योजनेतील विकास कामांच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या कामांमध्ये निकृष्ट दर्जाचा वापर होत असल्याचा आरोप करत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे माजी शहर प्रमुख अंकुश मामिडवार यांनी नांदेड येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली आहे. मुदखेड रेल्वे स्थानक हे मराठवाड्यातील महत्त्वाचे जंक्शन मानले जाते. केंद्र सरकारच्या पुनर्विकास योजनेअंतर्गत येथे विविध विकासकामे सुरू आहेत. मात्र प्रत्यक्षात सुरू असलेल्या कामांमध्ये दर्जाहीन साहित्य वापरले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे भविष्यात प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे. या संदर्भात अंकुश मामिडवार यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक १ व इतर भागांवर सुरू असलेल्या कामांमध्ये तांत्रिक निकषांचे पालन होत नसल्याचे दिसून येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आणि अभियंत्यांनी कामांची सखोल तपासणी करून दोषी ठेकेदारावर कारवाई करावी, तसेच निकृष्ट दर्जाचे काम तात्काळ थांबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सरकारकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही जर कामांचा दर्जा निकृष्ट असेल तर तो जनतेच्या पैशांचा अपव्यय ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित ठेकेदाराचे नोंदणी रद्द करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या तक्रारीमुळे मुदखेड रेल्वे स्थानकावरील सुरू असलेल्या विकासकामांबाबत प्रशासन काय भूमिका घेते याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

देगलूरचा 'मोरया स्मॅशर्स' नांदेडमध्ये गाजला

देगलूर -नांदेड जिल्ह्याच्या क्रीडा इतिहासात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या नांदेड बॅडमिंटन लीग सिझन-१ मध्ये देगलूरच्या मोरया स्मॅशर्स संघाने दमदार खेळ करत उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धेत नांदेडच्या शिवा स्ट्रायकर्स संघाने अंतिम सामना जिंकत विजेतेपदावर आपले नाव कोरले. दि. २१ व २२ मार्च २०२६ रोजी नांदेड जिल्हा क्रीडा अधिकारी इनडोअर हॉल येथे ही लीग मोठ्या उत्साहात पार पडली. एकूण आठ संघांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत सुरुवातीचे सामने लीग पद्धतीने खेळविण्यात आले. त्यातून अव्वल चार संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. यामध्ये मोरया स्मॅशर्स, शिवा स्ट्रायकर्स, सिंग वॉरियर्स आणि चक दे स्मॅशर्स या संघांचा समावेश होता. उपांत्य फेरीतील चुरशीच्या लढतीनंतर मोरया स्मॅशर्स आणि शिवा स्ट्रायकर्स यांनी अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात शिवा स्ट्रायकर्स संघाने बाजी मारत विजेतेपद मिळवले, तर मोरया स्मॅशर्स संघाने उपविजेतेपदावर समाधान मानले. उपविजेत्या मोरया स्मॅशर्स संघाला ११,००० रुपयांचे रोख पारितोषिक व चषक देण्यात आला, तर विजेत्या शिवा स्ट्रायकर्स संघाला २१,००० रुपये व चषक प्रदान करण्यात आला. मोरया स्मॅशर्स संघाचे मालक मनोज स्वामी व बसवराज पटणे होते. संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट समन्वय आणि कौशल्य दाखवत स्पर्धेत आपली छाप पाडली. संघात

गुरुद्वारा जमीन प्रकरणात उच्च न्यायालयाचा कडक आदेश

प्रशासनाला ६ महिन्यांत चौकशी पूर्ण करण्याचे निर्देश; याचिकाकर्त्यास मोठा दिलासा

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २६ मार्च-

मुंबई उच्च न्यायालयाच्या छ. संभाजीनगर खंडपीठाने नांदेड येथील गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुरसाहिबच्या जमीन (एकूण १८ सर्वे नंबर विषयी) प्रकरणात महत्त्वपूर्ण आदेश देत प्रशासनाला सहा महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे याचिकाकर्ते स. मनजीत सिंघ जगन सिंघ यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

न्यायमूर्ती विभा कनकनवडी व हितेन चानेगावकर यांच्या खंडपीठाने दिनांक १७ मार्च २०२६ रोजी हा आदेश दिला.

न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या कागदपत्रे, समिती अहवाल व जिल्हा सरकारी वकिलांच्या अभिप्रायाचा विचार करता, संबंधित जमीन (सर्वे नंबर ५,७,८,२३,६८,६९,१६ ,१३,२१,२५,२७,३५, ८६,९३, ९६ इतर) गुरुद्वाराच्या नावावर पाटेदार म्हणून नोंद असल्याचे प्राथमिकदृष्ट्या निदर्शनास आले. तसेच महसूल नोंदींमध्ये काही खाजगी व्यक्तींची नावे कायदेशीर प्रक्रिया न पाळता समाविष्ट करण्यात आल्याचेही स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ५३ अंतर्गत कारवाई आवश्यक असल्याचे नमूद केले.

सुनावणी दरम्यान प्रशासनाने सुमारे १० हजार व्यक्तींना सुनावणी द्यावी लागणार असल्याने प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी मोठा कालावधी लागेल, असे सांगितले. मात्र, १न्यायालयाने प्रशासनाच्या या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत टाळाटाळीचा प्रकार सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले.

सन्माननीय खंडपीठाने नांदेड जिल्हाधिकाऱ्यांना एका अधिकाऱ्याची नियुक्ती करून संपूर्ण चौकशी सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच अनावश्यक विलंब केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही न्यायालयाने दिला आहे.

या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडणारे ॲड. गणेश गाढे आणी ॲड स. जसबीरसिंघ यांनी प्रशासनातील त्रुटी प्रभावीपणे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यांच्या युक्तिवादामुळेच न्यायालयाने कडक भूमिका घेतल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, या आदेशामुळे महसूल नोंदीतील अनियमितता व बेकायदेशीर नोंदींविरोधात व्यापक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सन्माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णायमुळे याचिकाकर्ता सरदार मंजीत सिंघ जगनसिंघ आणि समाजातील स. बिरेन्द्रसिंघ बेदी, स. दीपकसिंघ गह्लीवाले, जगदीपसिंघ नंबरदार, स. मनबीरसिंघ ग्रंथी, स. मनिंदर सिंघ, स. गगनसिंघ सोहल, स. अमरजीत सिंघ सिलेदार यांनी समाधान व्यक्त केले आहेत.

धनगरवाडी येथील साई मंदिराचा हरी कीर्तनाने वर्धापणदिन साजरा

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २५ मार्च-

लोहा- कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा उपविधान समितीचे अध्यक्ष प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी स्थापन केलेल्या साईनगर धनगरवाडी येथील श्री साईबाबा मंदिराचा आठव्या वर्धापन दिन व श्रीराम नवमी उत्सव ह.भ.प.. अच्युत महाराज दस्तापुरकर यांच्या हरि कीर्तनाने गुरुवार दि. २६ रोजी पार पडला.

नांदेड तालुक्यातील धनगरवाडी येथे कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी भव्य दिव्य साईबाबांचे मंदिर उभारले आहे. साई मंदिराच्या वर्धापनदिनाच्या धार्मिक कार्यक्रमास नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव बोंढारकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ.प्रणिताताई देवरे चिखलीकर, अड संदीप पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला प्रदेश उपाध्यक्ष चित्राताई लुंगारे, माणिकराव मुकदम, माजी नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, कंधार नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

कर्मचाऱ्यावर नियंत्रण ठेवणारे मुकादमच अनियंत्रित

तभा वृतसेवा
लोहा, दि. २६ मार्च-

येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मुकादमाची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु हे मुकादमच सद्यस्थितीत अनियंत्रित असल्याचा प्रकार समोर येत आहे. दररोज हजेरी पटावर हजेरी नोंदवून हे मुकादम पसार होत असल्याने कर्मचाऱ्यांवर नियंत्रण कसे राहणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील प्रकार

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात केवळ नांदेड जिल्हा नव्हे तर आजूबाजूच्या परभणी, लातूर, हिंगोली आदी जिल्ह्यातूनही रुग्ण उपचारासाठी येतात. या रुग्णालयात अस्वच्छता असल्याच्या तक्रारी तसेच कर्मचाऱ्यांची कमतरता याबाबत अनेकदा ओरड होत असताना आता याठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचारी, सफाई कामगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेले मुकादमच स्वतःचे कर्तव्य बजावत नसल्याचे समोर आले आहे. याठिकाणी असलेले चारही मुकादम हजेरी पटावर हजेरी नोंदवून पसार होत असल्याचा प्रकार सुरु आहे. त्यामुळे रुग्णालयात अनागोंदी कारभार सुरु असून, कर्मचाऱ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी असलेले मुकादमच अनियंत्रित झाले असल्याची चर्चा सुरु आहे. या प्रकाराकडे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठातांनी लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

सावरगाव येथील ग्रामसेवक, विस्तार अधिकारी यांच्या गैरव्यवहार प्रकरणी चौकशी पथकाची नियुक्ती

तभा वृतसेवा
लोहा, दि. २६ मार्च-

तालुक्यातील सावरगाव (न) येथील ग्रामपंचायतचे ग्रामसेवक व ,२४ तासाचा प्रशासक विस्तार अधिकारी यांच्या गैरव्यवहार प्रकरणीची चौकशी करण्यासाठी शासकीय चौकशी पथकाची नियुक्ती केली आहे.

सावरगाव येथे मागासवर्गीय महिला प्रशासक संरपंच अनुसया बालाजी भावे यांनी जि.प.चे मुख्यकार्यकारी नांदेड यांना निवेदन देऊन या प्रकरणाची चौकशी करावी असे निवेदन देऊन उपोषण करण्याचा असा इशारा दिला होता.

हि बातमी दै.तरुण भारत वर्तमानपत्रामध्ये गैरव्यवहाराचा भांडाफोड केला याची दखल घेऊन तालुका स्तरावरील चौकशी समितीची नियुक्ती केली आहे यामध्ये सहय्यक गटविकास अधिकारी श्रीमती वानखेडेबाई , शिवाजी राठोड उपअभियंता जि.प.लोहा, देशपांडे विस्तार अधिकारी प.स.लोहा या पथकाची नियुक्ती केली आहे.

तरुण भारत इफेक्ट

लोह तालुक्यातील सावरगाव (न.) येथे अनुसूचित जाती महिला सरपंच पद राखीव आसल्याने.ग्रामसेवकाने सरपंचाला अंधारात ठेऊन गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांच्या संगनमताने फक्त याच गावची डी.एस.सी.चालु करुन निधी उचलला.

संपूर्ण महाराष्ट्रात (डी.एस.सी) डिजिटल पेमेट इलेक्ट्रॉनिक मशिन बंद असताना सावरगाव (न) ग्राम पंचायतची एकच मशिन चालू करुन काम न करता विस्तार अधिकारी, अभियंता, ग्रामसेवक यानी प्रशासक महिला सरपंचाल अंधारात ठेवून रक्कम उचलून हाडप करण्याचा प्रयत्न केला पण संरपंच अनुसया बालाजी भावे यांनी निवेदन देऊन चौकशी मागणी केली.या निवेदनाची दखल घेऊन दै.तरुण भारत ने वर्तमानपत्राने गैरव्यवहाराचा भांडाफोड केला अखेर शासनाने चौकशी पथकामार्फत चौकशी करण्याचे आदेश दिली अशी माहिती चौकशी पथकातील जबाबदारी अधिकाऱ्याने माहिती दिली.

चक्री येथे श्रीराम कथेचे आयोजन

ाभा वृतसेवा
नेवघा, दि. २५ मार्च-

हदगाव तालुक्यातील मौजे चक्री थे श्रीराम नवमी व महारुद्र हनुमान यंतीनिमित्य अखंड हरिनाम सप्ताह थराज ज्ञानेश्वरी पारायण व भव्य राम थेचे आयोजन करण्यात आले आहे. या खंड हरिनाम सप्ताहाला गुरुवार दि.२६ प्रिल २०२६ रोजी सुरुवात झाली असुन ा सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे ायोजन करण्यात आले आहे.

दररोज सकाळी ४ ते ६ काकडारती भजन, सकाळी ६ ते ९ ानेश्वरीपारायण, दुपारी १ ते ४ श्रीराम था, सायं ५ ते ७ हरिपाठ व रात्री :३० ते १०:३० हरिकीर्तन, असे नंदिन कार्यमाचे आयोजन करण्यात ाले आहे या सप्ताहात महाराष्ट्रातील विध भागातील प्रसिद्ध कीर्तनकारांची री कीर्तने होणार आहेत. गुरुवार दि.२ प्रिल २०२६ रोजी सकाळी ८ वाजता नुमान जयंतीनिमित्त श्रीची मिरवणूक ा ग्रामप्रदक्षिणेनंतर ११ ते १ या ाळेत संतोष महाराज पळसोनेकर यांचे ाल्याचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसादाने ा अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ोणार आहे. परिसरातील सर्व भाविक क्तांनी या अखंड हरिनाम सप्ताह व रोज सायंकाळी ४ ते ७ या वेळेत ायोजित महाप्रसादाचा लाभ घ्यावा से आवाहन समस्त चक्री ग्रामस्थांतर्फे रण्यात आले आहे.

नमुना इ-४
(नियम १८ पहा)

जा.क्र. रासनिआ/कक्ष-१२/ब वर्ग/नि.का. मंजूरी /१०८८/२०२६
दि. २३/३/२०२६

निवडणुक निर्णय अधिकारी :- डॉ. अम्रपाली बी. काशीकर, पदनाम सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), छत्रपती संभाजीनगर.
संस्थेचे नांव :- सोयगांव तालुका शेतकरी सहकारी दूध संघ मर्या. सोयगांव ता. सोयगांव जि.छ. संभाजीनगर

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ च्या नियम १८ प्रमाणे अधिकारांचा वापर करून आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे व जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरिता मी, डॉ. अम्रपाली बी. काशीकर, पदनाम: सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), छत्रपती संभाजीनगर, आणि जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मान्यतेने सोयगांव तालुका शेतकरी सहकारी दूध संघ मर्या. सोयगांव ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर या तालुकास्तरीय संस्थेच्या सन २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधी करिता समितीच्या सदस्यांची निवडणुक घेण्याकरिता नियुक्त केलेला, निवडणुक निर्णय अधिकारी, याव्दारे सोयगांव तालुका शेतकरी सहकारी दूध संघ मर्या. सोयगांव ता. सोयगांव जि.छ. संभाजीनगर या नांवाने ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणुकीचा कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करून जाहीर करीत आहोत आणि यासोबत जोडलेल्या अनुसुचीच्या स्तंभ-२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या संबंधातोल निवडणुका नियत करीत आहोत.

अनुसूचि (अंतिम मतदार यादी प्रसिध्द दिनांक १३/०१/२०२६)

अ. क्र.	मतदार संघाचे नांव		निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द दिनांक	नामनिर्देशनपत्र विक्री व दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक वेळ व ठिकाण	नामनिर्देशन पत्राची यादीचे प्रकाशन	नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक, वेळ व ठिकाण	विधीग्राह्य नामनिर्देशन पत्राची सुची प्रसिध्द करण्यांचा दिनांक व ठिकाण	उमेदवारी नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक	निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन	मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ	मतमोजणीचा दिनांक, वेळ व स्थळ	निकाल घोषीत करण्यांचा दिनांक
१	२		३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
१	१) सर्वसाधारण मतदारसंघ	८	दिनांक २७.०३.२०२६	दि.२७.०३.२०२६ ते ०६.०४.२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वा. पर्यंत निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, द्वारा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर प्रशासकीय इमारत, दुध डेअरी सिग्नल जवळ , जालना रोड,छ.संभाजीनगर (शासकीय सुटीचे वगळून)	दि.२७.०३.२०२६ ते ०६.०४.२०२६ जसे प्राप्त होतील तसे दररोज दुपारी ३.०० वा. नंतर निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, द्वारा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर प्रशासकीय इमारत, दुध डेअरी सिग्नल जवळ , जालना रोड,छ.संभाजीनगर	दि.०७.०४.२०२६ सकाळी ११.०० पासून छाननी संपेपर्यंत निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, द्वारा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर प्रशासकीय इमारत, दुध डेअरी सिग्नल जवळ , जालना रोड,छ.संभाजीनगर	दि.०८.०४.२०२६ स.११.०० वा. निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, द्वारा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर प्रशासकीय इमारत, दुध डेअरी सिग्नल जवळ , जालना रोड,छ.संभाजीनगर	दि.०८.०४.२०२६ ते दि. २२.०४.२०२६ वेळ स. ११ ते दु.३.०० वाजे पर्यंत निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, द्वारा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर प्रशासकीय इमारत, दुध डेअरी सिग्नल जवळ , जालना रोड,छ.संभाजीनगर	दि.२३.०४.२०२६ स.११.०० वा.निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, द्वारा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर प्रशासकीय इमारत, दुध डेअरी सिग्नल जवळ , जालना रोड,छ.संभाजीनगर	दि.०३.०५.२०२६ स.८.०० ते दु.४.०० वा. पर्यंत मतदानाचे स्थळ संस्थेचे कार्यालय व्दारा, सोयगांव तालुका शेतकरी सहकारी दुध संघ मर्या.सोयगांव ता.सोयगांव जि.छ.संभाजीनगर	मत मोजणी दि.०३.०५.२०२६ रोजी दुपारी ०४.०० ते मत मोजणी पूर्ण होईपर्यंत करण्यात येईल. स्थळ संस्थेचे कार्यालय, द्वारा सोयगांव तालुका शेतकरी सहकारी दुध संघ मर्या.सोयगांव ता.सोयगांव जि.छ.संभाजीनगर	दि.०३.०५.२०२६ रोजी मतमोजणी पूर्ण झाल्यावर, ठिकाण संस्थेचे कार्यालय, द्वारा सोयगांव तालुका शेतकरी सहकारी दुध संघ मर्या.सोयगांव ता.सोयगांव जि.छ.संभाजीनगर
२	२)अनुसूचित जाती / जमाती मतदारसंघ	१										
३	३) इतर मागासवर्गीय मतदारसंघ	१										
४	४) विमुक्त जाती/भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग	१										
५	५) महिला मतदारसंघ	२										
	एकुण	१३										

स्वाक्षरीत/-
(डॉ. अम्रपाली बी. काशीकर)
निवडणुक निर्णय अधिकारी
सोयगांव तालुका शेतकरी सहकारी
दुध संघ मर्या. सोयगांव ता. सोयगांव
जि.छ.संभाजीनगर

स्वाक्षरीत/-
(के.एम. शहा)
मा. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध)
छत्रपती संभाजीनगर

स्वाक्षरीत/-
मा. सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण म.रा.पुणे

Panchakshari Shivacharya Trust's

CHANNABASWESHWAR PHARMACY COLLEGE (DEGREE)

Kava Road, Basweshwar Chowk, Latur-413512 (Maharashtra) Tel./Fax: (02382) 243855
DTE Code :- 2253, University Code :- 947, MSBTE Code :- 2041
Email:- channabasweshwar@gmail.com/principalcbpc@gmail.com
Website:- www.channabasweshwar.org
Approved by:- Govt. of Maharashtra, PCI, New Delhi,
Affiliated to:- S.R.T.M. University, Nanded, MSBTE, Mumbai.
NAAC A

RECRUITMENT

Applications are invited from the Eligible candidates for the following posts. The applications should be in the format prescribed by University duly completed in all respect should reach the undersigned within 15 days from the date of publication of the advertisement at the college address. Candidates of reserved category should submit one copy of Application to the Assistant Registrar, (Special Cell) S.R.T.M. University, Nanded.

Sr.No.	Post	No. of Posts	Subject & Vacancies	Reservation
1	Professor	10	1) Pharmaceutics 2) Pharmaceutical Chemistry 3) Pharmacology 4) Pharmacy Practice 5) Quality Assurance 6) Pharmacognosy	Open-01, SC-02, ST-01, VJ(A)-01, NT-B-01, OBC-02, SEBC-01, EWS-01
2	Associate Professor	11	1) Pharmaceutics 2) Pharmaceutical Chemistry 3) Pharmacology 4) Pharmacy Practice 5) Quality Assurance 6) Pharmacognosy	Open-03, SC-01, ST-01, VJ(A)-01, NT-B-01, OBC-02, SEBC-01, EWS-01
3	Assistant Professor	05	1) Pharmaceutics 2) Pharmaceutical Chemistry 3) Pharmacology 4) Pharmacy Practice 5) Pharmacognosy	SC-01, VJ(A)-01, OBC-01, SEBC-01, EWS-01

Note :- The Government resolution dated. 25/01/2024, for Parallel (horizontal) reservation should be implemented strictly as per rules.
Professor :- Women – 04, Sports Person – 01, **Associate Professor :-** Women – 03, Sports Person – 01, **Assistant Professor :-** Women -04, Person with Disability – 01, Sports Person – 01.

Essential Educational Qualification & Experience: - As per the norms prescribed by PCI, New Delhi, Govt. of Maharashtra and SRTM University, Nanded.
For Detailed advertisement visit to university website:
https://srtmun.ac.in/advt-for-the-teaching-post-channabasweshwar-pharmacy-collegekava-road-latur/
Address:
To,

sd/-
Principal

sd/-
Secretary

अंबाजोगाईनर्सिंगमहाविद्यालयासाठी 'जायका' प्रकल्पातून मोठा निधी मंजूर

बीड | अंबाजोगाई येथील नर्सिंग महाविद्यालयाचा कायापालट करण्यासाठी केंद्र शासन आणि 'जायका' प्रकल्पांतर्गत मोठा निधी मंजूर झाला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत याची नुकतीच अधिकृत घोषणा केली आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या महाविद्यालयाच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी प्राप्त झाला आहे. राज्याची आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी आखलेल्या ३७०८ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा हा एक भाग असून जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीच्या सहकार्याने हा विकास प्रकल्प राबवला जाणार आहे. या निधीमुळे महाविद्यालयातील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावणार असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. स्थानिक पातळीवर प्रशिक्षित परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी निर्माण झाल्यामुळे परिसरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होण्यास मोठी मदत मिळणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमदार मुंदडा यांनी राज्य सरकारचे आभार मानले असून यामुळे अंबाजोगाईच्या शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात मोठी क्रांती होईल असा विश्वास व्यक्त केला आहे.

अंबाजोगाईत पेट्रोलचा पुरेसा साठा उपलब्ध; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे तहसीलदारांचे आवाहन!

बीड | अंबाजोगाई तालुक्यातील नागरिकांनी इंधनासाठी घाबरून जाण्याचे किंवा पेट्रोल पंपांवर गर्दी करण्याचे कोणतेही कारण नसून तालुक्यात पेट्रोलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची अधिकृत माहिती तहसीलदार यांनी दिली आहे. तालुक्यातील एक-दोन ठिकाणचे पेट्रोल पंप तांत्रिक कारणास्तव बंद असले तरी प्रशासनाने पेट्रोलियम पुरवठा प्रतिनिधींशी थेट चर्चा केली असून तिथेही लवकरच इंधन उपलब्ध होणार आहे. इंधन तुटवड्याबाबत कोणत्याही चुकीच्या माहितीवर किंवा अफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार यांनी केले आहे.

ॲड. रवींद्र कानडे समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

माजलगाव प्रतिनिधी | तुळजापूर येथे लिंगायत महासंघ द्वारा आयोजित लिंगायत समाज अधिवेशनामध्ये माजलगाव शहरातील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्री मंगलनाथ संस्थेला 25 वर्षे पूर्ण झालेली आहे. या कालावधीमध्ये सभासद व नागरिक यांच्या विश्वासास पात्र राहून कार्य करत समाजातील विविध दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य करून त्यांना आत्मनिर्भर आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य संस्थेच्या वतीने करण्यात आले. त्याचबरोबर केवळ व्यवसायास प्राधान्य न देता सामाजिक बांधिलकी जपण्याचा उद्देश आखून सामाजिक,सांस्कृतिक व धार्मिक कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर राहून समाज हिताची केलेल्या कार्याची दखल घेऊन लिंगायत महासंघाच्या वतीने त्यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



त्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. सदरील कार्यक्रमात लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष सुदर्शन बिरादार व प्रमुख उपस्थितीमध्ये धाराशिव जिल्ह्यातील महापौर, उपमहापौर, नगराध्यक्ष नगरसेवक,जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य उपस्थिती होते.

सदरील कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील हजारोच्या संख्येने समाज बांधव या कार्यक्रमास उपस्थित होते.

केज तालुक्यात पाणीटंचाईच्या तीव्र झळा; चार गावांसाठी बोअर अधिग्रहणाचा प्रस्ताव


बीड | उन्हाळ्याची तीव्रता वाढत असतानाच जिल्ह्यातील केज तालुक्यात पाणीटंचाईचे संकट गडद होऊ लागले आहे. तालुक्यातील साबला, आनंदवाडी, कोठी, बेलगाव आणि केळगाव या गावांमधील सार्वजनिक पाणीपुरवठ्याचे स्रोत निकामी झाल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत आहे. या भीषण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतींनी पंचायत समितीच्या टंचाई विभागाकडे बोअर अधिग्रहणाचे प्रस्ताव दाखल केले आहेत. जमिनीतील पाणी पातळी वेगाने खालावल्याने रब्बी आणि ऊस पिकांच्या सिंचनावरही मोठा परिणाम झाला आहे. पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी नागरिकांना आता प्लास्टिक ड्रम आणि मातीच्या माठ खरेदीला प्राधान्य द्यावे लागत आहे. प्रशासनाने यावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी होत असून क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या पाहणीनंतर तहसीलदार या प्रस्तावांना अंतिम मंजुरी देणार आहेत.

बीडमध्ये शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरूच; १४ महिन्यांत ३०५ बळी

बीड | जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे धक्कादायक वास्तव समोर आले असून मागील १४ महिन्यांत तब्बल ३०५ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली आहे. यापैकी ४८ प्रकरणांत शेतकरी कुटुंबे मदतीसाठी अपात्र ठरवण्यात आली असून २० प्रकरणांचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीपासून आतापर्यंत ५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद झाली असून यात गेवराई आणि आष्टी तालुक्यात सर्वाधिक प्रत्येकी १० आत्महत्या झाल्या आहेत. कर्जबाजारीपणा आणि नापिकीच्या तणावाखाली असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत सरकारी कर्मचारी 'नशेतून आत्महत्या' झाल्याचा अहवाल देऊन मोकळे होतात, असा गंभीर आरोप केला जात आहे. यामुळे अनेक पीडित कुटुंबे शासनाच्या एक लाख रुपयांच्या मदतीपासून वंचित राहत आहेत. प्रशासन या गंभीर मानवी प्रश्नावर कधी ठोस उपाययोजना करणार, असा संतप्त सवाल जिल्ह्यातील शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा सुमितकुमार भारस्कर ज्युनियर महाराष्ट्र केसरी

माजलगाव प्रतिनिधी | सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने महाराष्ट्र केसरी स्पर्धेत ७० किलो वजन गटात गादी विभागात सुवर्ण कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावत महाराष्ट्र केसरी ७० किलो वजन गटात विजेता ठरला. महाराष्ट्र केसरी अधिवेशन वाघोली, पुणे मुक्कामी १८ ते २२ मार्च २०२६



या दरम्यान पार पडले. यावेळी पै. सुमितकुमार भारस्कर यांनी पहिल्या ४ फेऱ्या १०-०० अश्या मोठ्या गुण फरकाने विजय मिळवत सेमी फायनल मध्ये पुणे शहरचा विपुल थोरात सोबत ०८-०५ अशी लढत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत कोल्हापूर शहरातील सत्तपा हिरगुडे सोबत सुमितकुमारने ०६-०० अश्या मोठ्या गुण फरकाने विजय मिळवून सुवर्ण पदक पटकावले.

अभूतपूर्व यशामुळे सुंदरराव सोळंके महाविद्यालयासह बीड जिल्ह्याचा दबदबा महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अधोरेखित झाला आहे. सुमितकुमार ला वेळोवेळी प्रा. नवनाथ आवारे, प्रा. प्रविण कोरडे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूला म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश भाऊ चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. स्वप्निल टाक, प्रा. संजय बागुल, प्रबंधक डॉ.प्रशांत चव्हाण, डॉ. सुदर्शन स्वामी, एकनाथ मस्के, यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

भारतीय बौद्ध महासभेचा भव्य धम्म मेळावा संपन्न

माजलगाव प्रतिनिधी | भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प या ठिकाणी शनिवार दि २१ मार्च रोजी भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या निमित्तान दि १३मार्च २०२६ पासुन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचे आयोजन फेब्रुवारी पर्यंत मौजे सावरगाव येथे महिला उपासिका तसेच मौजे बाभळगाव व कल्याण नगर येथे महिला उपासिका शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.



त्या शिबीराचा समारोप दि २१ मार्च २०२६ रोजी धम्म मेळाव्यात करण्यात आला या शिबीरासाठी पुज्य भन्ते डॉ. बी.सारीपुत्त होते तर केंद्रिय शिक्षक डॉ युराज मोरे होते महिला उपासिका शिबीरासाठी केंद्रिय शिक्षीका कल्याण नगर आद.कमलताई डोंगरे महिला जिल्हा अध्यक्षा तर संजिवनीताई धन्वे होत्या. मेळाव्यास मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष एस. के.भंडारे , राष्ट्रीय सचिव बी. एच. गायकवाड, राष्ट्रीय सचिव भिकाजी कांबळे , यु.जी.बोराडे, राज्य संरक्षण सचिव आद.अमरसिंह ढाका होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा ता. अध्यक्ष डॉ. भागवत साळवे होते . प्रस्तावीक गुलाब धाईजे यांनी तर सुत्र संचलन सिद्धार्थ वक्ते यांनी केले.मेळाव्यासाठी ॲड बी बी धन्वे, महालिंग निकाळजे , एस बी मोरे, शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,बी सी डोंगरे, शोभाताई भोजने,शारदाताई तांगडे, विष्णु कांबळे, सुनिल शिंदे, मंदाताई साळवे,मायाताई स्वामी, प्रा. एल आर.मस्के उपस्तीत होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे, दयानंद साळवे,एन डी गायकवाड,मोहन काकडे,बळीराम काकडे, बाबासाहेब घनघाव ,वंदनाताई घनघाव,वंदनाताई साळवे,कोमलताई डोंगरे, अनुराधाताई साळवे नितिन डोंगरे, भगवान डोंगरे,भानुदास साळवे,राजेभाऊ साळवे,डी पी पोटभरे डी पी वाघमारे, कावेरी साळवे, चंद्रकला साळवे सह भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

28 मार्च रोजी बीड येथे दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचे आयोजन

बीड,दि.25 (जिमाका) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड जिल्हा ग्रंथालय संघ व र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई येथे दिनांक 27 व 28 मार्च 2026 रोजी ग्रंथोत्सव 2025 चे आयोजन र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड येथे आयोजित केले आहे. या दोन दिवसीय कार्यक्रमात भव्य ग्रंथ प्रदर्शन, विक्री व साहित्यीक मेळावा आयोजित केला आहे. या कार्यक्रमात उध्दघाटन सोहळा, AI आणि साहित्यः AI चे लेखन, भाषांतर आणि वाचन संस्कृतीवर होणारा परिनाम या विषयावर व्याख्यान, सार्वजनिक ग्रंथालयांची स्थिती काल, आज आणि उद्या यावर परिसंवाद, कवि संम्मेलन व कथाकथन असे विविध कार्यक्रम दोन दिवस आयोजित केले आहे.

या कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणार आहे तसेच जिल्ह्यातील साहित्यीकांचे कथाकथन, कवीतांची मेजवानी राहणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथोत्सव समितीने केले आहे.

भारताच्या सौर ऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्राची झेप; अवादा ग्रुपच्या सौर क्रांतीचा मराठवाड्याला होणार फायदा

छत्रपती संभाजीनगर | भारताच्या सौर ऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्र आता एक मोठी झेप घेत आहे. नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत अवादा समूहाच्या 'अवादा इलेक्ट्रो' या युनिटने अवघ्या १६ सेकंदात एक सोलर मॉड्यूल तयार करण्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. या प्रकल्पामुळे नागपूर हे देशाचे 'सोलर हब' म्हणून उदयास येत असतानाच, याचे सकारात्मक पडसाद आता छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यात उमटत आहेत.

अवादा समूहाचे अध्यक्ष विनीत मित्तल यांनी नुकत्याच आयोजित 'चॅनेल पार्टनर मीट'मध्ये स्पष्ट केले की, नागपूर हे कंपनीसाठी एक धोरणात्मक केंद्र आहे. येथून उत्पादित होणारे प्रगत 'एन-टाइप TOPCon' सोलर मॉड्यूल्स आता महाराष्ट्रभर पोहोचवले जाणार आहेत. विशेषतः छत्रपती संभाजीनगरमधील औद्योगिक क्षेत्र आणि वाढत्या निवासी वसाहतींमधील 'रूफटॉप सोलर'ची मागणी पूर्ण करण्यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण ठरेल. ८.५ गिगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पामुळे स्थानिक सौर ऊर्जा इंस्टॉलर्स आणि वितरकांना मोठ्या प्रमाणावर तांत्रिक सहकार्य आणि उत्पादनांची खात्रीशीर उपलब्धता मिळणार आहे.





कंपनीने सादर केलेले ७२० डब्ल्यूपी क्षमतेचे नवीन मॉड्युल ऊर्जा निर्मिती वाढवण्यासोबतच प्रकल्पाचा खर्च कमी करण्यास मदत करते. याचा थेट फायदा छत्रपती संभाजीनगरमधील एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगांना होणार आहे, जेथे वीज बिलात कपात करण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर वेगाने वाढत आहे. याशिवाय, अवादा इलेक्ट्रोच्या या विस्तारामुळे मराठवाड्यातील तरुणांसाठी सौर तंत्रज्ञान क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. दर्जेदार मानकांमुळे हे पॅनेल्स मोठ्या सरकारी प्रकल्पांपासून ते घरांच्या छतापर्यंत सर्वत्र विश्वासाने वापरले जाऊ शकतील, ज्यामुळे राज्याची शाश्वत विकासाकडे वाटचाल सुरू झाली आहे.

ही सौर क्रांती केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित नसून, ती मराठवाड्याच्या सामाजिक-आर्थिक विकासालाही गती देणार आहे. छत्रपती संभाजीनगरमधील स्थानिक इंस्टॉलर्स आणि व्यावसायिकांशी हातमिळवणी करून कंपनी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करत आहे. यामुळे येणाऱ्या काळात छत्रपती संभाजीनगरच्या घरांच्या छतांवर नागपूरमध्ये तयार झालेले स्वदेशी बनावटीचे सोलर पॅनेल मोठ्या प्रमाणावर दिसतील, ज्यामुळे सामान्य नागरिकांचे वीज बिल शून्यावर येण्यास मदत होईल.

प्राचीन काळाराम, सावळाराम मंदिरात घेतले दर्शन ; परळीत रामराज्यासाठी दिल्या शुभेच्छा

पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत परळीत श्रीराम जन्मोत्सव सोहळा

महिला, पुरूषांची लक्षणीय उपस्थिती ; टाळ, मृदगांच्या निनादाने वातावरण भक्तीमय

परळी | राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील धार्मिक महत्त्व असलेल्या ऐतिहासिक काळाराम व सावळाराम मंदिरात आज श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा झाला. 'जय श्रीराम, जय जय श्रीराम' चा जयघोष करत परळीत रामराज्य व्हावे अशा शब्दांत त्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या.

अंबेवेस भागातील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या काळाराम मंदिरात आज दुपारी १२ वा. श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहात पार पडला. यावेळी महिला व पुरूषांची उपस्थिती लक्षणीय होती. ना.पंकजाताई मुंडे यांनी उत्सवात सहभाग घेतला. श्री राम जन्माच्या वेळी पाळण्याची दोरी त्यांच्या हाती देण्यात आली. भाविक महिलांसोबत



त्यांनी पाळणाही म्हटला. टाळ, मृदंगाचा गजर आणि संगीताच्या निनादाने वातावरण भारावून गेले होते. आरतीनंतर पंकजाताईंनी श्रीरामाचे मनोभावे दर्शन घेतले. गणेशपार भागातील सावळाराम मंदिरासही त्यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

यावेळी नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, भाजपचे ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, जुगलकिशोर लोहिया, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, डॉ. शालिनीताई कराड, ॲड शुभांगी गिते, नगरसेवक पवन मुंडे, निळकंठ चाटे,महादेव इटके, प्रीतेश तोतला,अरूण पाठक, आश्विन मोगरकर आदींसह असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

नेकनूर येथे कालिका देवीचे घेतले दर्शन

बीड कडे जाताना नेकनूर येथे ना. पंकजाताईंनी जागृत देवस्थान कालिका देवीचे दर्शन घेतले. वै. प्रात:स्मरणीय गुरु बंकटस्वामी महाराज यांचे शिष्य वै.ह.भ.प सुदामराव महाराज यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यासही त्यांनी भेट दिली. याप्रसंगी प्रभू श्रीराम यांचे दर्शन घेतले. याप्रसंगी उपस्थित भाविकांशी संवाद साधला.

श्रीक्षेत्र नारायणगडाच्या नारळी सप्ताहासाठी उमापूर नगरी सज्ज दि 31 मार्चला शोभायात्रेत ध्वज पथक, जिवंत देखावा

तभा. वृत्तसेवा

बीड | श्रीक्षेत्र संस्थान नारायण गडाचा ७४ वा नारळी अखंड हरिनाम सप्ताह महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या हस्ते उमापूर ता. गेवराई जि. बीड या ठिकाणी ३१ मार्च रोजी आरंभ होत आहे. या सप्ताहासाठी उमापूर वासियांकडून जय्यत तयारी सुरू आहे.५५ एकर क्षेत्रामध्ये मंडप उभारणीचे काम सुरू झाले आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी महंत गुरुवर्य शिवाजी महाराज यांच्या हस्ते मंडपला गुढी उभारण्यात आली. गावामध्ये मोठ्या उत्साहाचं वातावरण निर्माण झाले आहे. दि.३१ मार्च रोजी संपूर्ण गावांमधून मोठी वैभवशाली शोभायात्राकाढण्याचे नियोजन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.या शोभायात्रा मध्ये डी.जे, बँड पथक, ढोल पथक, लेझीम पथक, ध्वज पथक, महापुरुषांचा जिवंत देखावा. घोड्यांचे रथ, गावामधील शाळेतील वेशभूषा केलेले बालकलाकार, पंचक्रोशीतील भजनी मंडळ टाळकरी, भाविक भक्त मोठ्या उत्साहाने या शोभायात्रा मध्ये सहभागी होणार आहेत.

आगामी ३१ मार्च रोजी दुपारी १ ते ४ समाधान महाराज शर्मा यांच्या अमृततुल्य वाणीतून राम कथा होणार आहे. पहिले कीर्तन पुष्प शिवचरित्रकार ज्ञानेश्वर महाराज पठाडे कर्जत यांचे तर दुसरे किर्तन पुष्प जलाल महाराजसय्यद नाशिक, तिसरे किर्तन पुष्प जयेश महाराज भाग्यवंत मुंबई, चौथे कीर्तन पुष्प विशाल महाराज खोले मुक्ताईनगर, पाचवे कीर्तन पुष्प बाळू महाराज गिरगावकर, सहावे किर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध समाज प्रबोधनकार विनोदाचार्य निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, सातवे किर्तन पुष्प विनोदाचार्य ज्ञानेश्वर महाराज तांबे जेहूर नेवासा. व काल्याचे किर्तन मंगळवार दि.७एप्रिल रोजी शिवाजी महाराज मठाधिपती श्रीक्षेत्र नारायणगड यांचे होणार आहे. सर्व भाविक भक्तांनी या भक्तीमय सोहळ्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन शिवाजी महाराज यांनी केले आहे.